# क्षितिज



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८५

REFBK-0023983
REFBK-0023983

संदर्भ कक्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
यांसी संपादकाकडून
सप्रेम भेट,

२५.९.८३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८९
दा. क्र. २३.९.८३
वाचव्य ३०।९।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य [भेट आले]
२४८५
२३९८३
३०।९।८३

# ॥ क्षितिज ॥

संपादक : सुभाष धोत्रे / देवदत्त साने / विजया पास्ते

REFBK-0023983
REFBK-0023983

**प्रकाशक :**
- श्री. एम्. चंद्रकांत
- सौ. सुखदा धोत्रे

१७२, दाणी सदन,
डॉ. आंबेडकर रोड,
ठाणे.

**मुद्रक :**
सुभाष धोत्रे

**मुद्रणस्थळ :**
गुरुकृपा मुद्रणालय,
डोंबिवली, ठाणे.

© १९८३, श्री. एम्. चंद्रकांत ( डोंबिवली )
सौ. सुखदा धोत्रे ( ठाणें )

**मुखपृष्ठ :**
मधुकर आरकडे
परळ, मुंबई १२.

**प्रथमावृत्ती**
८ जुलै १९८३

**मांडणी :**
सुभाष धोत्रे, मधुकर आरकडे

**मूल्य पंधरा रुपये**

## "क्षितिज" सहभाग


१) मधुकर आरकडे १
२) विद्याधर दशपुत्रे ५
३) प्रतिभा धोत्रे ८
४) दत्ता नारंगीकर ९
५) गोविंद बोत्रे १०
६) श्रीकृष्ण वावगे १३
७) आशा पाठारे १५
८) जयवंत वैती १९
९) अजय काणेकर २०
१०) शिवाजी भाऊ वाडेकर २२
११) सौ. वसुंधरा गोरे २४
१२) किरण फाटक २५
१३) र. म. शेंजवलकर २७
१४) बण्डा जोशी ३०
१५) सुरेखा देशपांडे ३३
१६) विजयकुमार सरगडे ३८
१७) बबन लोंढे ४२
१८) हरिश्चन्द्र कांबळे ४४
१९) शंकर आपटे ४८
२०) पुष्पलता साळुंखे ५०
२१) प्रदीप देशपांडे ५२
२२) गिरीश तिळवे ५४
२३) अश्विनी कुलकर्णी ५५
२४) रामदास गरुड ५७
२५) राजस कल्याणकर ५९

२६) अरुण वर्तक ६३
२७) भय्या खानोलकर ६५
२८) अदिती जोशी ६७
२९) शेखर धोत्रे ६९
३०) चांगदेव काळे ७०
३१) विजय जामसंडेकर ७३
३२) पपेन्द्र परब ७६
३३) रविंद्र आवटी ७७
३४) भगवान निळे ८०
३५) कल्पना वर्तक ८३
३६) मृदुला नगरदेवळेकर ८४
३७) शिवराम देवलकर ८५
३८) संध्या पराडकर ८७
३९) वासंती नांदेडकर ८८
४०) रंजना भडसावळे ८९
४१) सिंधू जोशी ९०
४२) जनार्धन जाधव (देवदास) ९२

नमस्कार,

'क्षितिज' प्रातिनिधिक काव्यसंग्रह आपल्या सारख्या सच्च्या रसिकांच्या हाती देताना आज आम्हाला खूपच आनंद होतोय. अतिशय श्रमपूर्वक धडाडीने आणि खऱ्या जिद्दीने, आत्मविश्वासपूर्वक प्रकाशित होणाऱ्या 'क्षितिजा' ची निर्मल आभा आज खऱ्या अर्थाने 'क्षितिजा' च्याही पलिकडे प्रकाशमान होत आहे.

नवोदितांची अनेक कविसंमेलने आयोजित होतात ...... प्रसंगी गाजतात..... वाजतात... त्यातून अनेक कवी उदयाला येतात....... नावारुपाला येतात.... .. आणि काही... कोणी तरी...... उपेक्षिले जातात. आपणच आपलं कौतुक करीत रहातात. का? असं का घडतं? ...... ते कवी समाजाचे प्रतिनिधित्व करीत नाहीत का? ....... करतात! अगदी तळमळीने, खऱ्या अर्थाने करतात. आणि...... खऱ्या प्रेमाने, उत्साहाने 'क्षितिज' रेषेवर दैदिप्यमान होतात.... या क्षितिज रेषेवर प्रकाशमान होणारे ४२ कवी आज खऱ्या अर्थाने आपल्या सारख्या काव्यरसिकांच्या समोर, भविष्याच्या क्षितिजाचे, स्वत:ला गवसलेले उज्वल रंग घेऊन साकार होत आहेत. मित्रांनो एकवेळ कवी होणं सोपं, पण...... खरा, निष्ठावान रसिक होणं, जमतंच असं नाही ! विविधरंगी भावना, कल्पना, विचारांच्या अनुषंगाने अभिव्यक्त झालेले हे 'क्षितिज' आज आपल्या समोर साकार होत आहे. त्याला 'खरी' दाद देण्याचा चोखंदळपणा आपल्या ठायी आहेच ! शिवाय ..... आपले निष्ठापूर्वक रसिकत्वच खऱ्या अर्थानं आजच्या या क्षितिजाची प्रेरणा होय !

आमचे मित्रवर्य सुप्रसिद्ध कवी शान्ताराम नांदगावकर, पी. सावळाराम, गुरुवर्य प्र. श्री नेरुरकर, प्रभाकरराव जाधव, माधव कुलकर्णी, विनायक पानसरे, अच्युत ठाकूर, अरुण शंकर वर्तक, शशिकांत सावंत, प्रकाश खरात, भगवान निळे, प्रल्हाद जाधव, सौ. जयवंतबाई, प्रशांत नांदगांवकर यांनी "क्षितिज" वर खरं प्रेम केलं..... त्याचं कौतुक केलं.

आमच्या वरील प्रेमाखातीर वेळात वेळ काढून कविवर्य शांतारामजींनी 'क्षितिज' बद्दल थोडेसे–अगदी अभ्यासपूर्ण लिहिले. आमचे स्नेही कवी आणि चित्रकार मधुकर आरकडे यांनी आपल्या कुशल कुंचल्याने 'क्षितिज' चे मुखपृष्ठ तयार केले. या क्षितिजाची मुद्रणप्रत श्रीयुत द. ल. दुलम व त्यांचे सहकारी यांनी खऱ्याखुऱ्या आपुलकीने तयार करुन दिली.

श्री. एम. चंद्रकांत व सौ. सुखदा धोत्रे यांनी प्रकाशन कार्यात प्रकाशक म्हणून तत्परतेने हात दिला. या हातांमुळे आम्हाला 'क्षितिजा' पर्यंत सहजतेने वाटचाल करता आली.

'क्षितिज' निर्मितीमागे असलेले हे सर्व चिरस्मरणीय असे ऋणानुबंध आहेत. या सर्वांचे मनःपूर्वक आभार !

सुभाष धोत्रे
देवदत्त साने
विजया पास्ते

आभार :

सर्वश्री शांताराम नांदगावकर
प्र. श्री. नेरुरकर
मधुकर आरकडे
श्री. एम्. चंद्रकांत
सौ. सुखदा धोत्रे
श्री. द. ल. दुलम
आणि
कार्यवाह, मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणें.

## मुद्रण दोष

| पान क्र. | ओळ | दोष | शुद्धी |
|---|---|---|---|
| १६ | ७ वी | अजन | अजून |
| ४१ | ११ | स्वतं-याचे | स्वातंत्र्याचे |
| ४५ | ४ | उभंजग | उभं जग |
| ५१ | ६ | श्रद्ध | श्रद्धा |
| ५७ | १३ | रघुपती | रघुपत |
| ६१ | २ | प्रत्यक | प्रत्येक |
| ६३ | १६ | थली | इथली |
| ६४ | ११ | नि.शब्दाच | निःशब्दाची |
| ७७ | १४ | धरातून | धुरातून |
| ७७ | १८ | कथीत | व्यथित |
| ८१ | शिर्षक | आत्मगाण | आत्मगाणे |
| १०३ | ११ | सरगडेंघी | सरगडेंची |

## ॥ काढा सुरुंग आता ॥

काढा सुरुंग आता वाटेत पेरलेले
सारे उजेड अमुच्या डोळयांत साठलेले

ग्लानी ही पौरुषाला अमुच्या न ये कदापी
उच्छाद लाख मांडा ना ढासळू कदापी
व्हा सावधान आता समशेर शब्द झाले
सारे उजेड अमुच्या डोळयांत साठलेले

केलाय पाठ आम्ही इतिहास यातनांचा
मागू हिशोब आता पिढीजात वेदनांचा
झाकाल काय आता ते रक्त सांडलेले
सारे उजेड अमुच्या डोळयांत साठलेले

रद्दी अपार झाली भंगार देवतांची
आम्ही लिहू नव्याने उत्क्रांती मानवाची
उभवू पुन्हा नव्याने आधार भंगलेले
सारे उजेड अमुच्या डोळयांत साठलेले

घेऊ नका परीक्षा उध्वस्त संयमाची
समवेत आमुच्या रे ही फौज शोषितांची
अंगार सर्व आम्ही रक्तात ठासलेले
सारे उजेड अमुच्या डोळयांत साठलेले

ग्रंथालय
२४८५
दा. क्र. २३-९-८३
काव्य ३०।९८३
शाखा (स्थळ प्रत)

## मधुकर आरकडे

### ॥ सरते प्रहर ॥

प्रत्येक रात्रीचे सरते प्रहर मोजींत बसा
आड–रानात चिध्या झालेल्या वाकळच्या पालात
कलकलाट करीत –

कडुसे पडतांना घेतलेल्या दारुच्या तारेत
माहित असलेल्या संख्येपर्यंत
चांदण्या मोजीत –

प्रत्येक पहाटे चंबुगबाळ उचलून मार्गस्थ व्हाल
नव्या रोजगारासाठी जुन्या गावाची वेस ओलांडून
नव्या गावांत –

पुन्हा पालं ठोकाल गावकुसा बाहेर
कुठल्यातरी माळावर

कोंबडचा, कुत्र्या, मांजरांसह, सहकुटुंब सहपरिवार –
कलागती करीत येणारी प्रत्येक रात्र जागवाल, गाजवाल
नव्या दमाने पुन्हा कलकलाट करीत –

पोट पाठीवर घेऊन तुमचे भाकरीसाठी रानोमाळ भटकणे
तुमची अस्थिरता तुमची असहायता
तुमचे अज्ञान !

सगळं कसं शोभुन दिसतं
या महान संस्कृतीत ! ! !

## मधुकर आरकडे

### ॥ डोळे भरुन येती ॥

क्षितिजावरी उतरते आभाळ सांजवेळी
डोळे भरुन येती माझे अशाच वेळी

उठतात अंतरी या लाटा उधाणलेल्या
अस्पष्ट दूर होती वाटा विखुरलेल्या
ही खिन्नता चहुकडे व्यापून सर्व उरली
डोळे भरुन येंती माझे अशाच वेळी

हे कोरडे किनारे हसतात का गतीला
या वाहत्या जळाच्या का तेच सोबतीला
फसवी इथे तिथे ती हिरवळ विसावलेली
डोळे भरुन येती माझे अशाच वेळी

अंधारल्या दिशांनी हे मार्ग रोखलेले
येथे उजेड त्यांना सारे फितूर झाले
कृत्रिम या दिव्यांची आरास पेटलेली
डोळे भरुन येती माझे अशाच वेळी

## मधुकर आरकडे

तू नसल्यावर नुसती हुर हुर
उरते मागे अशी निरंतर
आणि तुझ्या त्या आठवणींचे
मनात माझ्या उठते काहुर

तू नसल्यावर उदासवाणी
सांज उतरते ऐल तिरावर
नेत्र कडांवर श्रावण सरीचा
मलाच नकळत फुटतो पाझर
आणि तुझ्या त्या आठवणींचे
मनात माझ्या उठते काहुर

तू नसल्यावर शांत चांदणे
धुमसत असते दूर रानभर
मिटल्या नेत्री तुझीच स्वप्ने
वेढीत येती मला रातभर
आणि तुझ्या त्या आठवणींचे
मनात माझ्या उठते काहुर

तू नसल्यावर परका वाटे
ओळखिचा हा सगळा परिसर
नीरस वाटे, हसणे, रमणे
तू गेल्यावर असे दूरवर
आणि तुझ्या त्या आठवणींचे
मनात माझ्या उठते काहुर

## ॥ एक प्रश्नचिन्ह ॥

तुझ्या साऱ्या बहाण्यामागचे दडलेले हसू
मी टिपले होते–
तुझ्या साऱ्या नकारात लपलेले होकार
मी फेडले होते–

तुझा स्पर्श कसा मेंदीसारखा
माझ्या बोटातून रंगला आहे–
...तुझ्या या नाजूक हलक्या ओझ्यानं
मी बुडालो का आहे?
मी......माझेपण......

ए, दचकलीस?
छे, कुठं काय......
–दिवा मालव पाहू.

## विद्याधर दशपुत्रे

### ॥ शब्दसूर्य ॥

प्रियकराच्या चोरट्या मिठीतून
निसटलेल्या तरुणीच्या वस्त्रासारखा
स्वप्नभूमिचे रंग पंखावर सांडलेला
एक पक्षी
पहाटेस माझ्यासमोर आला –
संथपणे बुडणाऱ्या सुर्यासारखा
आकाशभर भरुन राहिला...
आशयाच्या अंधाराखाली
पहिल्याच मातृत्वाची वाट पाहणाऱ्या
एखाद्या भारावलेल्या मातेसारखा
मी उभा आहे
शब्द सूर्य उगवण्याची
निस्तब्ध वाट पहात.........
किंचित उत्सुक ....., किंचित भयभीत॥

## विद्याधर दशपुत्रे

### ॥ अस्तित्व ॥

आटून सारे गेले असता
तरीही पाऊस पण कोसळतो
अदृष्टातून हात कुणाचा
बीजाबीजातून जीव भरवतो ॥

कधीकाळचा सूर्य उगवता
अंधारातच देह बुडावा
पैजा मरणाच्या घेता देता
जीवन–जीवन घोष करावा ॥

चैतन्याच्या कणाकणांनो
तेज आपुले विझवून या रे
मुर्दाडांच्या मृत आशांवर
घरटे आपुले उबवून घ्या रे ॥

चतकोराचे श्रेय आपुले
धन्य जाहल्या सात पिढ्या रे
डोक्यावरती आभाळ माझ्या
किती केवढे आहे बाप रे ॥

## प्रतिभा धोत्रे

### ॥ बावरी प्रीत ॥

अशीच असावी प्रीत बावरी
अशी असावी सांज कोवळी
रात असावी गर्द काजळी
धुंद फुलावा निशीगंध
अन्
तू ही व्हावीस मुग्ध लाजरी

खळीत हसावा चंद्र तुझ्या
भाली खुलाव्या चांद–चांदण्या
मऊशार अन् केशकलापी
अशाच याव्या नितळ लहरी

तुझ्या प्रांजल नेत्रामधले
भाव अनामिक मज स्पर्शावे
तुझ्या हृदयी मत्प्रेमाची
लहरावी गे गोड शिरशिरी
अशीच असावी प्रीत बावरी

## दत्ता नारंगीकर

### ।। क्षितीज ।।

रवी उदय सोन्याच्या पायाने
उमटतो पहिल्यांदा क्षितीजावर
दिनाची सुरुवात इथूनच होते
अन् दिनाचा शेवट .......

रवीच्या अस्ताने सोन्याच्या पायाने
उमटतोच शेवटचा क्षितीजावर
मातेच्या पोकळीत ममतेचा ठेवा
क्षितीजाच्या ओंजळीत मायेचा पसारा
देऊन झालर भूमंडळावर आभाळाची
क्षितीजाच्या कडा रक्षितात जगताला......

### ।। युती ।।

दोन ध्रुवांची दोन टोके । असतात एकाच पृथ्वीला ।।
दोन मनांचे जुळते नाते । हृदयाच्या ह्या युतीला ।।
दिनरातीच्या दोन पानात । मिटली जाते धरा ।।
सुखदु:खाच्या दोन तालात । सावरणारा तोच खरा ।।

## गोविंद बोत्रे

### ॥ वाट ॥

काळोखात मलूल झालेल्या वाटा
विषण्ण वैराग्याच्या अथांग नजरे सारख्या,
भासमान सरकणाऱ्या सावल्यांनी
दूरवर पसरल्यात ... ...
पावलांचे ठसे निशब्द अंधारात
वाहून गेलेत
वातावरणी मिसळून गेलाय
रातकिड्यांचा किर्रर्रऽऽ आवाज ......
मी एकटा फिरस्ता निघालोय अंधारात
डोळे रोखून वाटेचे शेवटचं टोक शोधायला .......
आभाळात मिणमिणणाऱ्या तारका
वर पहायलाही सवड नाही,
ठेच लागायची भीती ......
पुढच्या वळणावर माझ्या वाटेला
फुटलेल्या दोन जोडवाटा ......
एक वाट सरळ झाडांना गुरफटत
अदृश्य झालेली
दुसरी .. .................
कड्यावरुन खोल खोल खाली उतरलेली
क्षणभर मीं थांबलो ......
अंधाराच्या पलीकडे, क्षितिजाशी उजाडलं होतं
मी तसाच जोडवाटांना पाठ करुन चालू लागलो
नव्या उमेदीनं ......
नव्या उमेदीनं !!

## गोविंद बोत्रे

### ॥ सायंकाळ ॥

सायंकाळ .. ......
मुग्ध जाणिवेची तीव्र कळ
सलत राहते क्षितिजाशी;
आकाशात पसरल्या
शुभ्र निळया मेघांवर
गुलमोहरी जिवणी शोधीत
असते तृषार्त होवून !

त्याच वेळी आपल्या–
पिलांचे भविष्य सांगायला
पाखरे घरट्यात परतत असतात
दोनचार दाणे घेऊन !

आसक्तीच्या पंखाखाली
गुमान पहुडलेल्या पिलांना
धगधगणारी उब चेतवीत असते –
वांझ भविष्याची करडी नजर
काळयाशार वातावरणात विरुन जाते
अन् मुग्ध जाणिवेची तीव्र कळ सलत रहाते
सलत राहते ...... !!

## गोविंद बोत्रे

### ॥ तू गेलीस तेंव्हा ॥

तू गेलीस तेंव्हा
समईची वात मलुल झाली होती
बांगडयाची किणकीण अलगद
काळोखात विरुन गेली .......
रातराणीच्या गंधा सारखी
केशर ओले शब्द निसटताना
मी खुळ्या सारखा उभा होतो —
प्रत्येक शब्द आता दंव झाला आहे
कधी कधी डोळ्यांच्या किनारीवर
चमकून उठतो ...... !

## श्रीकृष्ण वावगे

### ।। तिरडी ।।

श्वास असे तो वरी
या जगी मी हिंडलो
न मिळाला आधार मजला
या तिरडीवर विसावलो–

आधार शोधला ठायीठायी
कसा न मिळाला एकही जण
आज मजला आधार द्याया
कुठून आले चौघेजण ?

आज नसे गरज कशाची
खजीना सांडला ह्या कुडीवर
वाटे जगी उगाच फिरतो
पै - पै करीत दारोदार

प्रेमाच्या सुरासंगे आज मी
खोटया आसवांनी न्हालो
प्रेमाच्या शब्दास पोरका मी
अंती पोरकाच राहीलो–

स्मशानात ही शेज रचली
हार फुलांनी कुडी सजली
जाळतील आज अस्तीत्व माझे
ते शांत निखारे.........

॥ प्रिती-भंग ॥

सूर उमटले, मनी विरहाचे
शब्द उमलले नयनी आसवांचे-
शिळा भंगली, गत स्वप्नांची
धुक्यात हरवली, वाट प्रितीची-
लालसा प्रीतीची, स्वप्नची ठरले
जणू दैव आज हा डावही हरले-

## आशा पाठारे

### ॥ पहाट ॥

उतरुन आली पहाट अलगद
रंग सांडले दिशातुनी
पाऊल थबके दवबिंदूचे
सूर उमलले फुलातुनी......

कुणी पाहिले नभास वेड्या
मिठीत जाता क्षितीजाच्या
खुणा कोण या ठेवून गेले
कळीकळीतुनी हृदयाच्या
प्रिया तुला मी आठवले मग
मुक्त बोलक्या क्षणातुनी
पाऊल थबके.........

गवतफुलांचे स्पर्श अनोखे
हळुवार मी चुंबियले
नाजूक पर्णावर लज्जेचे
संगीत सारे ओघळले
अशाच हळव्या पहाट वेळी
प्रिया बोल तू दिठीतुनी
पाऊल थबके.........

## आशा पाठारे

॥ आठवण ॥

वाटेत चांदण्यांच्या कोठून रात येते
स्वप्नातल्या सुखाला नि:शब्द गीत गाते

शब्दात सौख्य होते,होती बिलोर गाणी
हृदयात लाख काटे, मौनात दु:ख जगते
सखे तू निघून जाता झाली गीते दिवाणी
वाटेत चांदण्याच्या ...

पंखात आठवांचे ओले अजन श्वास
क्षितीजात शून्य ढळते ही सांज का निराश
तुळशीतल्या दिव्यात अंधारी रात झुरते
वाटेत चांदण्यांच्या......

आशा पाठारे

## ॥ तू येताना ॥

तू येताना नभ आतुरले ओथंबुनी खाली
मुग्ध जाईच्या गालावरती नक्षी रेशीम झाली

येताना तू लेऊन आलीस सखे चांदणे पुनवेचे
ओंजळीत तू हळू ठेविले अंबर झुलते स्पर्शाचे

पाहत असता तुला असे मी नजर चिंब झाली
मुग्ध जाईच्या . ...

अंगावर रंग प्रितीचे ओठांनी तू रेखियले
लावण्याचे लेणे माझ्या मिठीत अलगद विरघळले

न कळे दोघा स्वप्न नशिली रात कधी सरली
मुग्ध जाईच्या........

## ॥ समस्या ॥

गरीबीचा शाप आम्हा, नाही कुणाचा आधार ।
मायेची छत्र करपूनी, जीवन झाले निराधार!!
वाटत होते थाटावा संसार
शोधूनी जन्माचा जोडीदार
वंचित जगाला, म्हणून आमचा कोणी घेईना भार...
मांगल्याच्या स्पर्शाची ओढ मनाला
आले परी झंझावती जीवन वाट्याला
ऐकण्यास करुण साद मनाची कोणीच ना तयार...
कुणि देईना मदतीचा हात
फसवेगिरीचा बाजार जगात
आधाशी जगाच्या डोळ्यात, आमची उमटे तनुबहार ..
भुकेचा तप्ताग्नी पोटात उसळे
दारिद्र्यास कंटाळूनी पाणावले डोळे
परि न सुटल्या जीवन समस्या; घेतली मग माघार...
कुणि मन मारुनी; कुणी फसूनी
दैव रूसता आलो या बेछूट सदनी
स्वप्न, भावना, आशा तुडवूनी करण्या शरीर व्यापार

## शिवाजीभाऊ वाडेकर

॥ विकल मनास ॥

अरे वेडया मना, नकोस उगाच झुरु!
जीवनाचा खेळ खरा, आता झालाय सुरु...
दुनियेच्या सागरा मधला
तू एक थेंब असे
अन् बागेतील ताटव्याचें
चिमुकले तू पान असे
परि तुझ्याविन न उसळतील लाटा
न वाढतील उंच तरु... नको उगाच झुरु...
साफल्याच्या मंदिराचा रे
अपयश हाच पाया
भासे दृष्टीला जे जे मनोरम
आहे तीच केवळ माया
सुख स्वप्नांच्या मागे धावून
नको कर्तव्यास विसरु .. नको उगाच झुरु...
स्मृतीवर टाकूनी पडदा
घे कानोसा भविष्याचा
गोंजारित बसता अरिष्टांना
नाश होई रे जीवनाचा
हिंमतीने बांधुनी कटी
कर पुढची वाटचाल सुरुं... नको उगाच झुरु...

## अजय काणेकर

### ॥ सत्य ॥

सत्य असते सत्यासारखे
अर्ध्या भरलेल्या काचेच्या पेल्यासारखे
एक म्हणतो,
अर्धा पेला भरलेला आहे
एक म्हणतो,
अर्धा पेला रिकामा आहे
दोन्हीही सत्यच!
पण ..... तो एक

अर्धा पेला रिकामा आहे हे पहात नाही–
अन् हा एक
अर्धा पेला भरलेला आहे हे पहात नाही
म्हणजे सत्य अर्धे नसते
अर्धे असतो आपण
अर्धे असतो आपण.........

अजय काणेकर

## ॥ निश्चिती ॥

नदीच्या प्रवाहात
चांदणें स्थिरावले
तेथे आपली भेट
निश्चित असेल
**पण........**

उशीर झालाच तर
निळ्याभोर आभाळावर
तुझ्या डोळ्यातील काजळाची
एक फुली मारुन ठेव
खुणेसाठी!

सरकणार नाही सूर्य तेथून
उगवतीकडे
आणि मग
रात्र आपलीच आहे.

## आशा पाठारे

### ॥ पाऊस ॥

आभाळ वाकले रान सारे विसरले,
ओल्या सावळ्या मिठीत गर्द हिरवट झाले
गर्द हिरवट रान सांडे हळदीचे ऊन
दूर श्रावणाची ओली, वाटेवाटेतून धून
पानोपानी उरात सये आभाळ सांडले...

पंख पाखरांचे ओले तया भार साहवेना
येई झिंगून हा वारा तया तोल आवरेना
घन निळ्या नादातुन रान वेडे नादावले...

श्वास केवडयांचे चिंब गाती सुगंधी गाणे
नभ आले ओथंबून, झाले मेघांचे तराणे
मोरपंखी पावलात थेंबथेंब झंकारले...

असा झिम्मा पावसाचा, डोंगराच्या माथ्यावर
गर्द रानी आणि नभी नाही उरले अंतर
स्वप्न वेडे लावण्याचे, मोगरीत थरारले...

## जयवंत वैती

### ॥ प्रतिबिंब ॥

डोक्यावर असं आभाळ
अन् धुंवाधार दु:ख सोबतीला
आक्रोशणाऱ्या वेदना घेऊन
पाऊस डोळ्यातून आला .......

पाऊस डोळ्यातून आला
कोसळला ओठांवर चिंब
गालावरच्या खळीत पडले
अश्रूंचे ओलेते प्रतिबिंब ॥

### ॥ कटाक्ष ॥

जळत्या उन्हात उभी सावली
रोखून आसवांच्या धारा
व्यथा वेदना उरी जपून
का फिरतो उदास वारा?

का फिरतो उदास वारा
एकटाच अगदी श्वास रोखूनी
वाटेवरच्या वळणावरती
का पहातो मागे वळूनी....?

## सौ. वसुंधरा गोरे

### ।। गुल्मोहर ।।

मानसात तसा वसंतात
फुललेल्या फुलवेड्या
मोहरलेल्या गुलमोहरा......

चैत्रातला तुझा बहर
छेडुन जाई भावुक सतार...
मनामनातला पारवा
लपेटुन वासंतीक दुलई
सुगंधी आम्रमंजिरीच्या
फुलतो प्रमत्त लयीवरी...

नवतीचे तोरण दारावर
चैत्राची गुढी कौलावर
मिष्टान्नाचा लाभ पंक्तीवर...
तांबुस पिवळ्या तव फुलपंखी रंगानी
वेडे होते माझे मन
अन् जीवनार्थ उमगून
हसते तुझ्या फुलांसारखेच.........!!

किरण फाटक

## ॥ सूर हे आले कुठोनी ॥

आज या कंठात माझ्या सूर हे आले कुठोनी
गोठलेल्या या सुरांना जाग ही आली कुठोनी ॥

त्या सुरांनी तोडलेले बंध का आता जुळावे
दूर त्या वणव्यातूनी का वादळाला स्पर्श व्हावे
संथ झाल्या या जलावर आज ही वर्षा कुठोनी ॥

शब्द गेले सूर गेले गीत गेले संपूनी
श्वास झाले मंद आता गंध गेला संपूनी
तुडविता या फुलांना हाक ही आली कुठोनी ॥

धुंदलेल्या मोगऱ्याला दाद ना आम्ही दिली
तुडवूनी गुलमोहराची शान आम्ही मोडली
साद त्यांनी घालिता ही आसवे आली कुठोनी ॥

## किरण फाटक

### ।। श्रावणाच्या धारा ।।

श्रावणाच्या आल्या धारा
आज आसमंत सारा

जमिनीच्या झाल्या बागा
गोड गारवा गारवा ।।

असा हळवा हा वारा
फांदिफांदितून कसा

मना माझ्या हालवितो
शालू हिरवा दिसतो ।

पावसाची रिमझिम
कसे पाणी झाडातून

निळावलं माझं मन
जसे ठबके सपान ।

गुलमोहराची लाज
पुनः पुनः आठवण

माझ्या गालावर आज
कशी थेंबा थेंबातून ।

आज पाण्या पाण्यातून
धरणीच्या अंगावर

जमिनीची थरथर
गोड मिलनाची सर ।।

बरसे ग ओला ओला
जशी कोमल पाऊले

आज कोवळा हिरवा
ओलांडती ग उंबरा ।।

॥ एक सूचना ॥

राष्ट्रीय सहकारी साहित्य संमेलनात
एक मतानं ठरलेल्या नियमांनुसार,
व्याकरणाच्या नियमात काही बदल–
सर्व प्रश्नचिन्हे रद्द!
त्याऐवजी पूर्णविराम वापरावेत–
'उद्‌गार आणि अवतरण चिन्हासाठी
अमुक–तमुक संस्कृती मंडळाची खास अनुदान योजना–
कंस, टिंबे, तुटक रेषांसाठी–
राष्ट्रीयकृत गंगाजळीद्वारा अल्प दराने कर्ज मिळेल
सर्व छापखानेवाल्यांनी प्रश्नचिन्हें
बँकेत जमा करुन–
बदली चिन्हांचे खिळे घ्यावेत!!

॥ वादळवारा ॥

रंगपेटीतल्या रंगांची हजारो वादळं,
समुद्र ढवळून काढीत...
तुझ्या डोळ्यात उसळतांना...
तू भिरभिरुन मला शोधतेस
त्यावेळी मी स्वत:शीच हसतो
वादळातला वारा,
फारच थोड्यांना दिसतो...

## डॉ. र. म. शेजवलकर

### ।। कोणे एके काळी ।।

परस्पर हितकारी वृक्षवल्ली संस्थेच्या
एका सर्वसाधारण सभेत
एकमताने एक ठराव मांडला गेला—
'आमच्या मुळावर घाव घालणे बंद झालेच पाहिजे''
ठरावाच्या जल्लोषातच
कुणा एकानं प्रश्न केला.....
'कुऱ्हाडीच्या भोकात जाऊन बसलेल्या
आपल्यातल्याच एकाच काय ?
अजूनही दर पाच वर्षांनी—
अशीच सभा भरते—
असाच ठराव येतो
आणि हाच प्रश्न कुणीतरी विचारतो.......

॥ नूर-जहान्‌च्या कबरीजवळ ॥

नूरजहानच्या कबरी जवळ—मध्यरात्र विसावलेली
माझ्या ओंजळीत फुले
श्रावणात उंच झोपाळ्यावर-उंच झोक्यासरशी विखुरलेले स्वप्न रंग
अवतीभवती गोळा झालेत– .. ...!

अचानक अस्तित्वात पसरल्या–बाभळीच्या फांद्या
ओंजळीतल्या फुलांना काटेरी संदर्भ–हात रक्त बंबाळ !
पांढऱ्याशुभ्र कबरीवर–काळोखाच्या भाजून काढणाऱ्या
शापित सावल्या !

फुले फेकून उःशापासाठी मी –
तिच्या सावलीच्या शोधात रानोमाळ !
तिच्या सावलीच्या शोधात रानोमाळ . . .!!

## बण्डा जोशी

### उदास पावसाळी संध्याकाळ !

आळवी आकाश ओले, भैरवाचे सूर का?
वाहती साऱ्या नद्या या, आसवांचे पूर का?

कैक झाली वादळे, छातीत मी ती कोंडली
लपविता घायाळ जखमा फाटतो हा उर का?

जाहला नाही निवाडा, न्यायही नाहीच झाला
कालच्या हळव्या गुन्हयाची, आज शिक्षा क्रूर का ?

भोगल्या संगास होते रंग स्वर्गाचे किती
रंग आता ते सखी ग, भासती भेसूर का?

मैफिली सरल्या आता, गाऊन झाली भैरवी
परत आता आर्त स्वर ते आळवीशी दूर का?

आळवी आकाश ओले, भैरवाचे सूर का?
वाहती साऱ्या नद्या या, आसवांचे पूर का?

## बण्डा जोशी

### ।। पंत गेले, राव आले .... ।।

हाय वेसण घातलेले बैल येथे नाचती
खाऊनी पोळचा फुकाच्या, येथे टाळचा वाजती ।।

रोज देवी दर्शना, दिल्लीत रांगा लागती
पूर्वजांच्या शौर्यगाथा, षंढ येथे सांगती ।।

फस्त केले पिंड यानी, पळविले नैवैद्यही
हे अधाशी कावळे, या सर्व यांच्या पंगती ।।

गर्जती वाघापरी हे म्होरके गल्लीतले
तेच दिल्लीच्या सामोरी ढोपरावरी रांगती

पंत गेले, राव आले काम आहे वेगळे;
जर भुकेने रोगजर्जर माणसे हि खंगती ।।

सुरेखा देशपांडे

## ॥ काही क्षण ॥

काही क्षण तुझ्या भेटीचे
तुझ्या प्रेमाचे, अमृताने रसरसलेले

काही क्षण मूक प्रेमाचे
तुझ्या नजर भेठीसाठी आतुरलेले

काही क्षण अबोल प्रितीचे
ओठावरचे शब्द, ओठावरच विरलेले

कांही क्षण तुझ्या भेठीसाठी
तळमळणारे, विरहानें व्याकुळलेले

असंख्य क्षण तुझ्यासाठी झुरणारे
प्रयत्न करुनही तुला न विसरलेले

## सुरेखा देशपांडे

### ।। व्यथा ।।

आयुष्याच्या कितीतरी वाटा
पायाखाली तुडविल्या गेल्या
अजून ध्येय दूर आहे
कुठवर चालायच समजत नाही
दूरवर यशाचे शिखर दिसते
वाटेवर वाटसरु भेंटतात
साथ देऊन निघुन जातात
अखंड साथी कुणीच नाही
दूरवर यशाची तुतारी वाजते
पण तुतारी ऐकायला मन
स्थिर नसते. ते भरकटते...
जीवन जगण्यासाठी आहे
पण त्यातला अर्थच कळत नाही

## सुरेखा देशपांडे

### ॥ अधुरे प्रेम ॥

आपण आपले अश्रू
स्वतःच पुसायचे असतात

मनातील भावना अशाच
मनीच ठेवायच्या असतात

डोळ्यात अश्रू लपवून
असेच हसायचे असते

अबोल प्रेम असेच
मुग्ध फुलवायचे असते

अधुरे राहिलेलें प्रेम
कधीच विसरायचें असते

हृदयाच्या कोपऱ्यात
जपून ठेवायचे असते

## सुरेखा देशपांडे

### ॥ एकांत ॥

एकांतात या आठवतात
जुन्या आठवणी आयुष्याच्या
त्या आठवणीतच मन जाते
आहारी दुःखाच्या -

त्या दुःखात एकच धागा
असतो सुखाचा
पहिल्या, वहिल्या पण...
पण 'अधुऱ्या, प्रेमाच-

सुरेखा देशपांडे

## ।। प्रितीची आस ।।

पाऊलवाटा आयुष्याच्या
अशाच दूर चालत गेल्या
पाऊल खुणाही पुसत गेल्या
काही काही तशाच राहिल्या–
दूरवरुन प्रितीचा मंद
गंध दरवळीत आला
सभोवती दरवळत
वाऱ्यासंवे निघून गेला–
हळूच एखादी वाऱ्याची झुळूक
स्मृती तुझी घेऊन येते
आठवणींना उजाळा देत
प्रितीची आस मनी उरते ।।

## विजयकुमार सरगडे

### ॥ गुन्हा ॥

भावरहीत शिळी फुले
देव्हाऱ्याला वाहू नकोस
विटंबून देव्हारा प्रितीचा
देवपण घालवू नकोस...

गाभाऱ्यात भग्न हृदयाच्या
भावहीन प्रीत ज्योत
पोकळ प्रितीच्या घंटानादानं
नको माजवूस स्तोम...

प्रीत पुजेची भावचेष्टा
करतेस का पुन्हा पुन्हा!
प्रीत केली पवित्र मी
काय हा माझा गुन्हा ?

॥ गझल ॥

दग्ध हृदयाची कहाणी तू अशी वाचू नको
ओघळणारे अश्रु माझे, तू चोचीने वेचू नको
या विराण वाळवंटी तू पुन्हा फिरकू नको
तप्त वेदना कोमल पायी तू अशा साहू नको
मध्य रात्री स्वप्नी येवून तू अशी जागू नको
विरह काळ्या काजळ राती, स्मृतिदीप लावू नको
मी शोधितो दैव माझे, तू मला शोधू नको
संगतीने येवून ऐसी व्यर्थ तू शिणू नको
अंतरंगी मी तुझ्या, अंतरीत जळू नको
नको जळू तू अंतरी, आच मज तू लावू नको.

## विजयकुमार सरगडे

॥ क्रांती ॥

थापाड्यांच्या नकोत थापा
थाप डफावर अशी हवी
गर्जत हरहर सह्यगिरीवर
दुमदुमणारी साद हवी
तलवारीच्या पात्यालाही
बिजलीची ती धार हवी

आसमंता भेदील ऐसी
धडधडणारी तोफ हवी
न्यायाची चाड आणिक,
अन्यायाची चीड हवी

मुरडील मुंड्या धर्मांधांच्या
अशी विचारधारा हवी –
भेदालाही भेदिल ऐशी
महात्म्यांची शक्ती हवी

देशभक्तीची होईल ढाल
अशी निधडी छाती हवी
शब्दांचाच बने धबधबा
अशी काव्य स्फूर्ती हवी-

हृदयाच्याही अंतगर्भी
हिमालयाचे धैर्य हवे
धैर्यालाही देईल धीर
सह्यगिरीचे शौर्य हवे

शौर्यातही सत्य-शांतीचे
गौतमाचे तेज हवे
स्वातंत्र्याचे फुंकीत शिंग
भगतसिंगाचे रणशिंग हवे

या सर्वांना घडविल ऐसे
मातृत्वाचे दिव्य हवे -

## बबन लोंढे

### ॥ कविता ॥

तू गेलीस त्या दिवसापासून
अनामिक शद्बकळा लेवून;
अव्याहतपणें वहातोय शद्बांचा महापूर
आयुष्याचे सारेच संदर्भ उलगडीत

त्या उत्तररात्री नंतर......
माझी प्रत्येक कविता भळभळती जखम झालिय
नि माझं आयुष्यही

आता निदान कवितेच्या कोपऱ्यातला
चेहरा तरी वाचित जा
त्यावर कोरलेला शाप
जो तू दिलेला असतो .........

## बबन लोंढे

|| कविता ||

उगवतीचे रंग लेवून
कोण हसलं गालात?
हृदय मंदिराच्या दारी
कोण थिरकलं तालात ?

उन्हाहूनी पिवळं पिवळं
हळदिचं अंग तुझं;
काय जादू केलिस तू
वेडावलं मन माझं.

## हरिश्चंद्र कांबळे

॥ माझ्या बंधो उठ ।

माझ्या बंधो उठ
उठल्याशिवाय चालणार नाय
आता कधी चुकला–बिकलास
आता बाबा येणार नाय ...॥

अन्यायाची रेलचेल इथे
काळोखाचे घुबड
सारेच आंधळे चाचपडतात
त्यांना कुठे सवड?

माझ्या बंधो बाजूस सर
तुझा रस्ता वेगळा हाय
विसरु नको तुझ्या हाती
प्रकाशाची चूड हाय......॥

मरी आय, जोगाय भगत गीरी
त्यांच्या माथी सटवी हाय
पंचशिल प्रज्ञा धम्मपद
अजून त्यांना कळत नाय

माझ्या बंधो ठावूक हाय
बाबांची चैत्य भूमी
तेवते जीथे सतत ज्योत
प्रकाशाची नाही कमी......॥

याच ज्योतीत आपली मशाल
तुझा दोस्त पेटवून घेईल
फक्त तुझा दोस्तच काय
उभंजग तीथं येईल......॥

तुझ्या मागे जग येईल
तरीं त्याला सामून घे
प्रज्ञा शील करुणा धारा
सर्वभूती वाटून दे ......॥

वाटून दे पंचशील
आभाळाचं काळीज कर
जायचं अजून दूर हाय
प्रत्येकाचा हात धर
प्रत्येंकाचा हात धर......॥

## हरिश्चंद्र कांबळे

### ॥ नॅशनलायझेशन ॥

... तर मित्रांनो
हे आहेत नि:श्वास
पीडीतांचे ... दलीतांचे
आणि माझ्या कोमेजल्या मनाचे
हे धैर्यधर समाज पुरुषा...

झळकताहेत अजून
तुझ्या रुढींचे ताम्रपट
इतिहासाच्या पानोपानी
ज्यांनी टीकविली सिंहासनं !
केवळ जानव्याच्या क्वालिफिकेशनवर
ज्यांनी टीकविली गुरुवर्यता,
बलदंड बाहूंच्या क्षत्रीयांवर देखील
ही परंपरा......

ब्राह्मण्य पूजणारी
एकलव्याचा अंगठा तोडणारी
अस्पृश्याला वेदान्त नाकारणारी
शंबूकाशी बेईमान होणारी
आणि दलितांची झोपडी जाळणारी
ही परंपरा......
अन्याय!
अत्याचार!!
बलात्कार!!!
सबलाने दुर्बलांवर केलेला बलात्कार
त्याचे साजरे झालेले विजयोत्सव
अरे, कुणीच कां करणार नाही
नॅशन्लायझेशन
माझ्या दु:खांचे ... ?
माझ्या दु:खाचे ... ?

## शंकर आपटे

॥ संदेश ॥

शूर तुम्ही, वीर तुम्ही, भारताचे आधार तुम्ही
सज्ज रहा लढण्यास हो सांगते हे आज मी

रक्षण करु या स्वतंत्रता ही संपदा
सुरेख संधी ऐसी न लाभे पुन्हा कदा
अमर असू द्या स्वाभिमान तो तुमच्या रक्तातूनीं......

शौर्य होते फार मोठे शिवरायांकडे
आदर्श त्यांचा नित्य ठेवा तुमच्यापुढे
देशसेवा तैसी घडू द्या आज तुमच्या हातूनी .......

अमर ते गांधी–टिळक, शास्त्री–नेहरु
शांती लाभो त्या जीवांना ऐसे कार्य ते करु
सूड बुद्धी कधीही नसू दे तुमच्या ध्येयासाठी . ...

## ॥ घरकुल ॥

इथेच होते तुझे राजसा घरकुल इतके छान
आठवणींच्या कळ्याफुलांनीं विसरे अंतर्धान
चंपक होता पुढच्या दारी वाटेवरी मोगरा
सुरंगीच्या झाडामधुनी सुगंधीत येई वारा
वाटेवरच्या आम्रतरुवर चाले कोकीळगान
जाई जुई अन् प्राजक्ताची शुभ्र फुलें अंगणी
हळूच छेडी मस्तीने ते कारंजातील पाणी
सजे ताटवा कमळफुलांचा तळ्यात पानोपान
अथांग सागर पाठीमागे त्याचा भव्य किनारा
निशिगंधाने धुंद होतसे आकाशांतील तारा
मधुमालतीच्या त्या वेलीची समोर होती कमान

## पुष्पलता साळुंखे

### ॥ दिवा स्वप्न ॥

दरवळला रे गंध जो श्वासांत भिनून गेला
विसरु कसे रे रोम रोम चेतवून गेला
अंगात शिरशिरी येते कांपते उगा का मी
डोळ्यांत नीज नसते, दिवास्वप्न पाहते मी

### ॥ वसंत–बहार ॥

खुलते कळी मनाची, जेंव्हा, तुझी माझी भेट होते
गालावर पडते खळी, जेंव्हा नजरेला नजर मिळते

तुज पाहून राजसा ओठांवर येते गीत
परी शब्द न फुटतो अशी कशी रे प्रीतीची ही रीत
स्वप्नात पाहते रुप तुझे, तू स्वप्नांचा राजकुमार
ये घोड्यावर होऊन स्वार, फुलवित वसंत-बहार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८५
दा. क्र. २३१९८३
दिनांक ३०।११।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

॥ आयुष्य ॥

ज्या सांज भेटी अपुल्या वाळूत रुपेरी झाल्या
फुलबागा तुझ्या माझ्या श्वासांत पेटून गेल्या

सुखासिन आयुष्याची मी लाख पाहिली स्वप्ने
त्या धुंदमंद रात्रीं कापरापरी जळून गेल्या

जगणे कसले आता मरणेंच झाले प्यार
आयुष्यकशासाठी श्रद्ध गळून पडल्या

## प्रदिप देशपांडे

माझ्या जवळची सारी फुले
तुला दिली होती तेव्हा
तू म्हणाली होतीस,
....या फुलांना वास नाही
तेव्हा,
तू फक्त बिसरत होतीस
की,
तूच दिलं होतंस त्यातलं
फुलन् फूल
मी जगावं म्हणून......?

बावन्न/क्षितीज

## प्रदिप देशपांडे

आकाशाला धूळ चारणारं
एक वादळ अजुन यायचंय
जन्म घेवून!

तो पर्यंत फक्त होणार आहे पंदास
सुर्याचा प्रकाश सहन न होणाऱ्या
वटवाघळांची
या देशात !!

श्रेपत्र/क्षितीज

## गिरीश तिळवे

### ॥ हद्गत ॥

गंध कोकण मातीचा
मज मनोमन सुखावतो
देवाचं देणं असलेला कल्पवृक्ष
क्षणोक्षणी फोफावतो
बहरलेला आम्रवृक्ष
मज वेड लावीतो
नारळी- पोफळीच्या थंड बागात
तृषार्त जीव शांत होतो
पाहूनी फळे लगडलेले वृक्ष
दगडाचा मोह बळावतो
पाहूनी कोकणी उदार दारिद्र्य
जीव कोठेतरी दुखावतो.

## अश्विनी रा. कुलकर्णी

॥ भिक्षा ॥

एक आगळा एक भुकेला
नाही काही हातात
आहे प्राण डोळ्यात
जगाकडे पाही तो प्रश्नांकित
अन् ! ......
विचारे मनाला....
झालो का इतुका मी जड या जगास
नाही मिळेच काही
या भुकेल्या पोटास
बस !!
इच्छा एकच आहे
मिळो एकदा हातात काही
मग पाहीन मी
सृष्टीत नाविन्य काही
अजून गवसले न काही ह्या विश्वास
पाहू कसा मी रे,या डोळस विश्वास
असूनही डोळे पाहावयास–
न मिळे काही
हे देवा.......
नको पाहूस अंत
आता तरी हातात दे, तू काही!!

## अश्विनी रा. कुलकर्णी

आज आहे मी
परि नसल्यासमान......!
जिवंत आहे अजून
जिवंत नसल्यासमान
आहेत पहात मजकडे
एक क्षुद्र म्हणून...
आणि पाही मी जगी या
काही आपुले म्हणोनी ...!
राहु किती दिनी मी
जगास ह्या देत ओझं !
आले जरी रडत
जाईन मी हसत
कारण.....
आहे मी ऋणी या जगाची

## रामदास गरुड

**॥ कैकयी ॥**

कैकयी! चतुर अहा तू किती!
ठाऊक तुजला शाप द्विजाचा
श्रावणाच्या वृद्ध पित्याचा
शोकावेगे दशरथ जाईल
रामाच्या मागुती ! ...कैकयी....

वाचविण्या गे प्रिय रामाला
कवटाळीले तू जननिंदेला
आप्तजनांच्या क्षोभाची तू
झालीस ग आहुती ! ...कैकयी...

तुझे थोरपण कळले कोणा?
लपविले अश्रू दिसले कोणा?
वैधव्याची कुऱ्हाड झेलून
वाचविले रघुपती ! ....कैकयी...

वाचविले रघुपती म्हणोनि
घडले रामायण
घडले रामायण म्हणोनि
जोजविले शिलगुण

त्या दिव्यत्वाची आभा माते
सतत तुझ्या गे भवती ! ...कैकयी

## रामदास गरुड

मंदावला शुक्रतारा
जडावल्या पापण्या उशिच्या
लाजली ही पूर्वबाला
पवन हा मिठीत धुंदीच्या

काळचा घोंगडीच्या खाली
उब घेई जग सारं
फिक्कटला रंग तिचा
पांढुरकी छाया वर

अशा वेळी आपण आप्त
तूही तृप्त–मी ही तृप्त
क्षणाच्याच विसाव्यानं
हे ही सारं होईल गुप्त

उठ सखे सोड मिठी
काढ हे गुलाबी हात
विझलेला दिवा तेथे
फुलव आता त्याची वात

सौख्य साठा जरी येथे
आहे स्थिर राहिलेला
परि काळ मानवाने
नाही स्थिर ठेवियेला

आता आहे धावायाचे
पळायचे–पडायचे
आणि केव्हा कुठेतरी
जाऊनी गे मरायचे

॥ विक्षेप ॥

## राजस कल्याणकर

### ।। स्वप्न एका पहाटेचे ।।

तू दिलेल्या दुःखाचा पहिला भर ओसरला
डोळ्यांनी आपला नित्यनेमे भरुन येण्याचा-
परीपाठही सोडला.
आता सर्वत्र नुसतीच विकल उदासी
आणि कशाबशा उरलेल्या असंख्य दिवसरात्री

कधी फक्त पहाटेचे स्वप्न
तू आसासून हात हातात घेतल्याचे
ढिम्म पावसाळी सर्द हवेला
अकस्मात उधळून टाकावे तसे

आता तरी ढगांनी पुन्हा घनघोर जमावे
आणि.........
बस, एकदाच तुटून पडावे.

## राजस कल्याणकर

डोळ्यातून स्वागताची सहस्त्रदळे उधळीत
मी उत्साहाने तुझ्या हाती हात गुंफीन
तेव्हा कदाचित् माझेच पाय अदृश्य चिखलातल्या
कमळवेलीत गुरफटलेले असतील

तुझ्या कोषात एक पाकळी उघडताना
शंभर पाकळ्या मिटून घेणारी मी
कदाचित् (क्रमाक्रमानं धीट होताना)
तुलाच कुस्करुन जाईन

आणि तुझ्या तहानलेल्या ओंजळीत
मी जेव्हा माझ्या सर्वस्वाची सततधार धरीन
त्याआधीच कदाचित
मी पुरुषभर पाण्यात पूर्ण बुडालेली असेन
पूर्ण बुडालेली असेन ! ......

॥ स्वागत ॥

॥ अतृप्तता ॥

चहूकडे केवळ आनंद दिसतो आहे
प्रत्यक चेहरा फुलारलेला
हवेत सुवास भरुन राहिलेला
प्रसन्न अतंरित श्वासांचा-
माझ्या पदराचेही एक टोक
हळूच पुढे सरकते आहे
नि मी फिरवलेली निग्रही पाठ
पाठमोरी होण्याच्या तयारीत-
तू येऊन एक जखम करुन जा
मग सगळे कसे व्यवास्थित होईल-

॥ पाखरु ॥

डोळे बावरे भावूक
कसे पाण्याने भरले
आधी पाखरु नाजूक
त्यात पंखही भिजले

## राजस कल्याणकर

॥ आर्तता ॥

सावळी धनदौलत पोटाशी वागवीत
आभाळ अगदी अवघडून गेलेलं–
माझ्या निर्धन खिडकीने
उदार आकाशापुढे आतुर पदर पसरलेला–
माझ्या डोळ्यात आजन्म तहानलेलं वाळवंट
मैल मैल अस्ताव्यस्त
अशी आकर्ण ताणलेल्या प्रत्यंचेसारखी
ही आर्त ओढ भरत असतानाच
तू अवचित आलास.........
आणि कोरड्या कौलारुच्या आडोशाने
सगळा चिंब भिजवून गेलास...!

## अरुण शं. वर्तक

### ॥ पेटवा मशाली ॥

आक्रोश क्रौर्य घाला
शर लागला जिव्हारी
आता मना मनाच्या
ह्या पेटवा मशाली!
गांधो तथा गतांना
तुडवून कोण आले ?
मनुजास काळ डोही
बुडवून कोण आले ?

नेजाम हैदरांगी
तोडीत मूर्ती कोणी ?
ही शापद्वैत वाणी
अन् पाप माथी कोणी ?
कोणास ज्ञात आहे
सत्धर्म कर्म नीती
शिवबाप स्पर्शलेली
थली पूनीत माती

अजूनी मनात माझ्या
हरिनाम अन् पोवाडा
डोळी अजून माझ्या
जळता मराठ वाडा
चोख्याने, नामयाने
गंगापवित्र केली
तोडून सर्व भिंती
'बाबा' कृपाच केली

आता तुटून द्या हो
द्वैतातल्या दऱ्यांनो
शरपंजरी हाडांच्या
ना काम कर्मठांना
आता जळून द्याहो
विश्वस्थ बांधवाना
विश्वस्थ बांधवांना!

अरुण शं. ब्रतंक

## ॥ क्रांतीसूर्य ॥

हे खंड प्राय देशा
तू संतांच्या पंथाचा
आणि...... नवनव्या
फुलपंखी रंगाचा

तसा –
तुझा स्थायीभाव
स्वैर सह्याद्रीचा
वारा प्यालेला...
हिमालयाची उंची
मनाच्या मापाने मोजणार

नि:शब्दाचं पालखी
इंद्रायणीला धाडणारा ..
हे खंड प्राय देशा
तुझ्या पायात
मणामणाच्या बेड्या
हव्यातच का?

मग–
इतल्या दलालांना
कलालांना, कावळ्यांना
घुबडांना, नि चालत्या-फिरत्या
मुड्यांना
केव्हा बरं प्रकाशणार क्रांती सूर्य
खऱ्या अर्थानं, खऱ्या अर्थानं!!

## भय्या खानोलकर

### ॥ कडेलोट ॥

असेच होते करायचे तर
जीवनीं माझ्या आलीस का?
बोट मधाचे लाऊनी ओठा
मोहोळ तू उठविलास का?
मधांतल्या मधमाशाकरवी
उगा मना डिवचिलेस का?
तोडायाचे होते तरमग
नाते तू जोडीलेस का?
प्रेमवृक्ष हा पवित्र होता
शुक्लेंदुवत् वाढत होता.
मुळावरती कुऱ्हाड हाणूनी
समूळवृक्ष तोडीलास का ?
पूर्वजन्मीचे असेल नाते
ह्या जन्मी आम्हीं इथें भेटलो
हसलो–रुसलो-कधी न विसरलों
उंच कड्यावर नेऊनी माझा
कडेलोट केलास का?

## भय्या खानोलकर

छातींत येते कळ
जीव घेणारी – संपवणारी,
पण दाबून ठेवतोंय ती
तुझ्यासाठीं – तुझ्यासाठीं!

मरण मला बोलावतंय
पाश आपले आवळतंय
तरींपण जगतोंय मी खुळ्यासारखा
तुझ्यासाठीं – तुझ्यासाठीं!

जगायचं नाहीं मला
'त्याच्या' अधीन व्हायचंय
पण तीरडीवर पडण्याआधीं
तुझ्या मांडीवर विसावायचंय ! ।। आस ।।

## ॥ हरवलेले क्षण ॥

त्या क्षणांच्या विश्वात
किती क्षण विसावले

हसतील का ते बिंदू
ह्या रुंद – अरुंद टोकावर ?

लोपले ओहोटीत तारे
क्षिणल्या त्या चांदण्या

रुसले का ते चंद्र सूर्य
ह्या क्षणाच्या विश्वात ! !

## सौ. अदिती शिरिष जोशी

### ॥ सावज ॥

भावनांनी भावनांना प्रश्न का तो टाकला
शब्दांच्या ह्या काठावरुन पाय का तो निसटला ?
ह्या काठावर गस्त आहे
पापण्यांना पापण्यांची
बंध होऊन एकदा तू
सावज त्या पारध्याची ...

श्रमतील लोचने, पाहून ते अलोट मोती
होशील अबोल अन् ...
शब्दाविनाच हरशील ...

## ॥ दोन मने एक व्यथा ॥

आशावादी धरती माझ्याच सारखी
कोरड्या डोळ्यांत स्वप्ने, प्रितीने ओथंबलेली ......
सुकलेल्या नद्यांतून हाडे दिसतात, पण नजर आभाळात
शेवटी तो आला पण ती ? ... ती नाही आली ......
आडदांड पण तो आला आणि गेला ......
शृंगाराची तिची स्वप्ने उन्मळून पडली
या विशाल वटवृक्षा प्रमाणे
पण मी ... मी तर रोजच उन्मळून पडतोय विरहाने
रसिकांना हवी आहे कविता तिच्या माझ्या शृंगाराची
"पण कल्पनेला तो शृंगार ?" वाटतं
मी माझ्याच प्रतिभेवर करतोय बलात्कार!
कल्पनेतल्या कळ्या कागदावर चितारताना
वास्तवाचे काटे मला घायाळ करतात !!

## चांगदेव काळे

### ॥ सेवा ॥

आमची सेवा चरणी तुमच्या न रुजू
महामेरु तुम्ही पानगळीच्या काय छाया
बहर वांझोटा, स्वागत स्वागतच नसे कर न जुळता
कळते तुमच्या करवती नजरेत
उसनें काही नाही इथे –

हसलो, ते बाजारातून विकत आणलेले
थोटच्या हाताची शपथ
आईसुद्धा बाजारातून आणली होती
जन्म घेण्यापुरती –

जग जिंकायची, स्वर्ग पायी तुडवायची मनीषा
उगाळून लावली
हाताला घुमारे फुटलेच नाहीत हो, जोडायला तुमच्यासाठी
अबलख वारु लगाम खेचूनही तुमचीं मनें
समजली नाहीत
बाबूजींना वाईट वाटले मागासले संबोधल्याचे
मारलेल्या मनावर वळ उठत नाहीत आताशा
आडातच नाही तर ...... ? –

पुण्याच्या राशीवर लोंळणारे तुम्ही
आडवाटेनें आलात
महापुण्याच्या बेटावर जायचे तुम्हाला ! पण
—— माझी झोपडीहां नेली शेकोटीसाठी

अगोदरच्या पुण्यात्म्यानी –
तुम्ही माझे भस्म लावा
महापुण्यात्मे व्हाल
बस्स ! हीच सेवा समजा !
हीज सेवा समजा !!

## चांगदेव काळे

॥ ८१ च्या कमानीखाली ॥

या पेटलेल्या सुर्यांना
दयेच्या तेलाचे दान घालून
लीनतेचा पाढा वाचायला भाग पाडू नका ॥

पाकळ्या तुटून पडलेल्या
गंध देठात अजून जपलेला
मनात कोरलेल्या तस्वीरी बिघडवू नका ॥

उमेदीच्या शंभर योजना
सळसळणाऱ्या रक्ताला कुदळीची साथ
पेरलेली माणसं उकरुन काढू नका ॥

स्फूरलेली जातधर्मकुळीची वाणी
स्वैर मुसाफिर उधळीत गाणी
गाथा, गीता, गोलपिठा ... जोभ हासडू नका ॥

थोडा रंगमंच थोडी युद्धभूमी करण्या साजरी
थोडा देह पूर्ण आत्मा
एक्क्याऐंशीच्या कमानी खाली
गाडू नका
लीनतेचा पाढा वाचायला भाग पाडू नका !

विजय ज्ञामसंडेकर

## ॥ अपंग वर्ष ॥

बातमी वाचली...बातमी ऐकली...
१९८१ साल आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष
साजरं करण्याची घोषणा झाली–
अपंगांची वेदना अेका वर्षापुरती कमी झाली.
चेहऱ्यावर आणलेल्या उसन्या हास्याची
शोकेसी भिंतीवरुन जाहिरातबाजी सुरु झाली–

मी पाहतोयः
या कंत्राटी संस्कृतीत माणसांच्या महापूरातून
त्यांच्या वाहत जाणाऱ्या कुबड्या
बस-रेल्वेच्या बिनचेहऱ्यांच्या कळपात
चिरडलं जाणारं त्यांच्या शरीराचं बोचकं
लाथाडतात इथले संस्कृती पाय
तेव्हां ते करतात इथल्या बेगडी मानवतेला सलाम !

कालच्या स्वातंत्र्यदिनाला अपंगांची बोळावणं केलेली
अपंगांचा उद्धार व्हावा म्हणून व्यासपीठी छापील भाषणे ठोकली.
अपंगाने बोट दाखवून आजची देशाची गरज दाखविली !

## विजय जामसंडेकर

काल बातमी आली...
अपंग स्त्रीच्या देहवस्तीवर रात्री कावळ्यांचा उत्सव होता
'आम्ही माणसांचा पिंड शिवतो' या विषयी वाद होता.
अपंगाना स्वतःच्या पायावर उभे रहाता यावे म्हणून
अपंगांच्या कृती समितीने
कुबडी दौरा ठरवला !!

आणि आजची बातमी...
'अेका अपंग स्त्रीने आत्महत्त्या केली
कारण मात्र काहीच कळू शकले नाही
नुकत्याच आलेल्या बातमीनुसार
'ती मुकी असून तिला हात नसल्याचे समजते'

तेव्हा १९८१ साल....
आंतर राष्ट्रीय अपंग वर्ष म्हणून साजरं होतंय
वर्षाच्या उत्सवात त्यांच्या अवयवांचा लिलाव होतोय
वर्षाच्या उत्सवात त्यांच्या अवयवांचा लिलाव होतोय !

## विजय जामसंडेकर

### ॥ कविता ॥

आजवर दु:खच पिऊन जगत आलो
नशेतल्या प्याल्यातला रंग न्याहळला नाही...

शिक्क्यांचे ठसे कपाळावर उमटत आले
शिक्क्यांवरचा डाग दिसलाच नाही...

जुनेरांवरुन रंगत आलेल्या बातम्या
डोळ्यांच्या मांडणीत कंपोझ केल्याच नाही...

वेशीवर टपकणाऱ्या कावळ्यांच्या सावल्यात
अमावस्येची रात्र बाहुल्यात जागलीच नाही ..

काळ्या कथांच्या लाल इतिहासाच्या पानांवरचे
अश्वत्थाम्याचे रक्त–चित्र पापण्यांत कोरलेच नाही...

आता, गळयात अडकवलेला गडद भूतकाळ फोडताना मात्र
गातो आहे, मानवमुक्तीचे गीत–नवी संस्कृती उभरताना...

## पपेंद्र परब

### ॥ ती ॥

का ? कोण जाणे ?
मज ती का छळते ?
धरुनीच मज का बसते ?
मज ती का ना सोडते ?

तिला ओठांचा स्पर्श करता
धुंदी मज का देते
धुंदीचा सुस्कारा सोडता
तीव्र नशा मज येते

तिच गोड स्वाद घेता
अंगारापरी भडकते
हृदयाशी येऊनी भिडता
मोहक धुंदी येते

ती जर न मिळता
चैन मज ना पडते
थोडा पैका खर्च करता
कोण बरे ती
येऊनी थबकते ?

## रविंद्र आवटी

### ।। समाजवाद ।।

समाजवाद येत आहे, समाजवाद येतो आहे,
समाजवाद येत आहे
गरीब भटकती रस्तोरस्ती
नदी वाहते जीवनाप्रती
प्रत्येक चेहरे दुःखाचे नि त्रासनेचे
छटा खचेल पणाची की दैन्याची
किंकाळीतून प्रत्येकाच्या
आक्रंदनातून भीतीच्या
जखडलेल्या बंधनातून
गजबजलेल्या रस्त्यातून
निःश्वास हा येतो
मानवतेच्या किंकाळच्यातून समाजवाद येत आहे,
समाजवाद येत आहे ।।१।।

गिरण्यांच्या चिमण्यांच्यां धूरातून
साफ करण्या काळवंडलेल्या मालकांचे चेंहरे
काळवंडलेल्या चर्चचे घंटेचे निनाद
दुर्दैवी सैनिकांचे निःश्वास
हे सर्व हृदय कथीत करतात
पुढारी गरीबीचे बुरखे घेतात
निवडणुकीच्या फुलातून पैशाचे
मधूरस चाखत चाखत
समाजवादी गुलाबी स्मृतीतून
समाजवाद येत आहे,
समाजवाद येत आहे ॥ २ ॥

क्षितीज/सत्त्याहत्तर

## रविंद्र आवटी

... रात्रीच्या या भयाण वेळी
बिचाऱ्या तारुण्यसंपन्न वेश्या
दुर्दैवाला शापीत असलेल्या
नवजात बालकांच्या गळ्याला
नख लावीत असलेल्या पहातो
दुःखाला पारावारच राहत नाही
विवाह संस्थेचे दफन झालेले पाहून
भडभडून येते, भडभडून येते नी
समाजवादाच्या गप्पा करणाऱ्यांचे मुडदे पाडावे लागतात ॥

पण,
समाजवाद येत आहे गजबजलेल्या रस्त्यातून
गरीबीच्या हाकेतून लोकांच्या किंकाळ्यातून
की वेश्यांच्या तारुण्यांतून
कोण जाणे ......
पण हे मात्र निश्चित.
समाजवाद येत आहे,
समाजवाद येत आहे ! !

## रविंद्र आवटी

### ।। पर्वा नाही ।।

काही शद्ब बरे
काहीं शद्ब वाईट
त्याची मला पर्वा नाही
ते मी उधळणार आहे

काही मार्ग काटेरी
काही मार्ग रुपेरी
त्याची मला पर्वा नाही
ते मी तुडवणार आहे

काही वारे मखमली
काही वारे वादळी
त्याची मला पर्वा नाही
त्यातून मी जाणार आहे

झिमझिमणारी एकच सर
सोसाट्याच्या अनेक सरी
त्याची मला पर्वा नाही
त्यातच मी वहाणार आहे

काही दिशा सोनेरी
काही दिशा काळोखी
त्याची मला पर्वा नाही
माझी दिशा गाठणार आहे

क्षितीज/एकोणऐंशी

## भगवान निळे

### ।। जेव्हा तुझी याद येते ।।

जेव्हा तुझी याद येते
नेहमी प्रमाणेच रात्रीही उदासच असतात
नि, चंद्र भटकत असतो
निस्तेज ताऱ्यात वाट चुकलेल्या प्रवाशासारखा

हे सांगताना मला आता दुःख होत नाही
कि, पावसाळ्यात बेघरांचे काफिले बसावेत वळचणीला
तसा मीही घेतलाय आसरा कवितेचा
आपल्या तुटलेल्या संबंधानंतर

कदाचित तू आता विसरलीही असशील
आज आठवणारही नाही तुला
कधीकाळी तूच सांगितलेल्या कहाण्या मला
लैला–मजनू, हिर–रांझा, रोमिओ–ज्युलिएट
तुझ्या माझ्या

असा माझ्याच नशिबी कसा योग जुळून आला
स्वतःचाच कातिल शोधण्याचा ?
पण वाईट वाटतं ते याचचं
की, माझा कातिल कुणी पारधी नव्हता

नेहमी प्रमाणे आजही रात्र उदासच आहे

क्षितीज/अंशी

## ॥ आत्मगाण ॥

"स्वत:चच घरटं डोळयादेखत जळताना पाहूनही
पक्षी गात असतो आत्मगाणी"

असे म्हटले होते तेंव्हा मी,
तू माझ्याकडे किती चेष्टेनं पाहिलंस
अन् कशी हसलीस बेपर्वाईनं
रखरखत्या उन्हात, हँगींगगार्डनच्या झाडाखाली

नि आज.
तब्बल तीन उन्हाळयानंतर फाटलेल्या आभाळाखाली
असं मी कसं म्हणेन
"तू माझा विश्वासघात केलास"
पण, मला असं रस्त्यावर गाताना पाहून
तू अशी कावरी बावरी का?
तुझ्या डोळयात अश्रू तरी का?

## ॥ सांगायच तात्पर्य ॥

दूर कोपऱ्यात चिडीचिप उभा असल्यावर
हल्ली प्रत्येकजण तुझ्याच बद्दल विचारतोय

'तू खुशीत आहेस'
इतकंच मी सांगतो.

तेव्हा माझा पडलेला चेहरा पाहून
प्रत्येकजण क्षणभर जागीच घुटमळतो......

पण माझ्याकडे पाहून माझ्याबद्दल विचारायचं
त्यांना कधी धैर्यंच होत नाही !

सांगायचं तात्पर्य इतकंच,
माझ्यावर प्रेम करणारे खूप आहेत.....

एकटी तू सोडून !!

कल्पना वर्तक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. .........
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

॥ क्षण ॥

एखादा क्षण घेवून येतो
सुखाचे चांदणे......

हसणाऱ्या ओठात
एखादा क्षण देवून जातो
दुःखाचे देणे......

पाणावल्या पापण्यात
लाख क्षणात एखादाच क्षण
जीवन जगून जातो......

हरवलेल्या एखाद्या क्षणात
मनाला खूपसं गवसून जात......

क्षितीज/ज्याऐंशी

## मृदुला श्री. नगरदेवळेकर

### ॥ खळबळ ॥

त्या दिवशीही अशीच बसले होते
आनंद भरल्या मनानी
याच कातळावर
आनंद उसळत होता
समोरच्या फेसाळणाऱ्या लाटांसारखा
वाटलं होतं ..... तो तरी ......
पण, तोही
त्या फेसासारखाच !

मागून येणाऱ्या लाटेच्या तडाख्यानी
विरुन जाणारा....... आणि
दोनचार तुषारांनी
अंग भिजवण्याचा निष्फळ प्रयत्न करणारा.
आज मात्र वेगळेच प्रतिबिंब दिसते आहे
उदास, संथ लाटांवर
अंतरातील खळबळ लपविण्याचा प्रयत्न
सागराचा आणि माझाही !

## शिवराम देवलकर

### ॥ हॅलो ! मी कामगार बोलतोय ! ॥

हॅलो !
हॅलो, मी कामगार बोलतोय
माझ्या श्रमाचा हिशोब मागतोय
तुम्ही म्हणें मुलाखत दिलीत
जिन अँड लाईमचा प्याला रिचवीत दिवाळखोरी जाहीर केलीत

हॅलो ! तुम्ही अशा कशा केल्यात खुणा
मी इकडे क्षणा क्षणाला होतोय उणा
उरल्या सुरल्या लाजेचे कातडे ओढून
तुम्ही बसलात अस्तित्वाचे सुतक पाळीत
आमच्या पौरुषत्वाच्या धैर्याला मर्यादांच्या दोरखडाने आवळीत

पण हॅलो !
माझ्या डोळ्यात इकडे संग्राम पेटलाय
रक्तात पेरलेलं क्षितीजही हाका मारीत उठलेय
तळहातावरल्या रेषान् रेषा मार्चिंग साँग गात पुढेच गेल्यात

## शिवराम देवलकर

हॅलो ! तुम्ही म्हणालात बंगल्यावरच भेटा मगच बोलू
पण तुमचा पत्ताच खोटा, तुम्हाला कुठे धुंडाळू
म्हणून म्हणतो ही नोंद घ्या
तुमच्या सर्वच वाटा आता आमच्या नजरेच्या टप्प्यात आहेत
चलनी नाण्यासारखा तुमचा तो परवलीचा शब्दही
सोललेल्या बकऱ्या प्रमाणे सोलून वेशीवर टांगला आहे

हॅलो ! तुमची ती ओबेरॉय शेरेटॉन मधील
विश्वास गमावलेली रात्र केंव्हाच पंक्चर झालेय
तुम्ही सूर्य बाजारात आणू बघताय
पण लक्षात ठेवा !
आम्ही केंव्हाच काळोख झाडून दिशा साफसूफ करुन ठेवल्या आहेत
कारण !
उजेडाचे आम्हीच खरे वारसदार
बॅरेकेटस उभारुन याची नोंद घ्या !

## संध्या पराडकर

### ।। आमची क्रांती ।।

पुढाऱ्यांच्या पोटाचे घेर वाढवणारी
दारिद्र्य रेषेचा फेर वाढवणारी आमची क्रांती ।।

फुटणाऱ्या काचांचे आवाज
धमक्या देणारे नशेबाज
खादी पांघरलेले बेरके यांनी घडवलेली क्रांती
आमची क्रांती रक्तरंजित खरी

पण ते रक्त ही आमचेच !
'आपलेच दात आपलेच ओठ'
याची तंतोतंत येते प्रचिती !!

राष्ट्रध्वजाच्या भगव्या रंगांत
भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात
विलीन झालेल्या क्रांतीला वर्षे लोटून गेली

ती उदात्त क्रांती विसरा आता
आता नुसत्या मागण्या, घोषणा
निशाणी, धिक्कार आणि शिवीगाळ

या साऱ्यांचे दाहक रसायन म्हणजेच क्रांती
आमची क्रांती, हो ! हीच आमची क्रांती !!

## वासंती नांदेडकर

### ॥ मन गवसेल का ? ॥

मन रंगीत रंगीत
सप्त सुरांचे संगीत... ॥१॥

मन खट्याळ खट्याळ
एक वारे अवखळ... ॥२॥

मनाचा कुठे नाही थारा
नाचणाऱ्या या जलधारा... ॥३॥

मन कधी सामसूम
हरवते आपुलीच उब... ॥४॥

कधी होते तजेलदार
गायी गाणी दारोदार... ॥५॥

मन कधी जड जड
फिरे रात्रंदिन वणवण.... ॥६॥

मन कधी होई आकाश
साठवूनी अवघाची प्रकाश... ॥७॥

मन कधी जाईजुई
कारंजी नाचतात थुई थुई... ॥८॥

मन एक तीव्र ओहळ
साऱ्या भावनांचे मोहोळ... ॥९॥

असा हा व्यापार मनाचा
कधी हरवूनी पुन्हा गवसण्याचा .. ॥१०॥

रंजना भडसावळे

## ।। आसुरी आस ।।

अस्फूट हास्य अवतरले ओठी
स्फूटून आले मनी अंतरी
समजत होते मीच तयांची
परंतु निघाली परक्याची ।।

होती आस मजला तयाची
होती कल्पना उडत्या पंखांची
लाविली आस मनीच तयाने
वाट पाहिली आतुर क्षणाने ।।

लाखात होता एकच तो क्षण
परंतु ठरले क्षणिकाचे स्वप्न
जाहले जीवन क्षणिक सुखी
तरीही आस, त्याच उडत्या पंखांची ।।

## सिंधु जोशी

### ॥ रिती ॥

अश्रुंचीच ओंजळ त्यात कुठले मोती
देऊन तुला सरले सारे राहिले किती ?

सांध्यरंग दिले तुला चांदरात अर्पिली
विस्मरुन अस्तित्वाला जीवन सरिता व्यापली

आता किनारी उभा रहा येऊ नको पुढती
देऊन तुला सरले सारे राहिले किती ?

मयुरांचे मेघ झाले चकोराचा चांदही
ग्रीष्म जीवनी तुझीया जाहले बरसातही

तुटलेरे बंध सारे प्रीत नाही संगती
देऊन तुला सरले सारे राहिले किती ?

सिंधु जोशी

## ॥ अखेरची भेट ॥

भरुन घेते एखादा गंध तव श्वासाचा
भरतीच्या लाटेंत या अतृप्तता भासते

परतीच्या भीतीने मन माझे स्फुंदते

येरझारा घालताना अर्धाक्षण स्पर्शाचा
भरुन घेते एखादा गंध तव श्वासांचा

विरहताना नौकेत या शीडही आनंदले
वादळाच्या आठवणीने बल्हे मनी आक्रंदले

सांध्यगीत गाताना तोल जाई स्वरांचा
भरुन घेते एखादा गंध तव श्वासांचा

मोजताना चुकली बगळयांची शुभ्रफुले
फुलताना मिटली पाकळयांची नेत्रदले

भोवऱ्यात गढताना आधार मज स्वप्नांचा
भरुन घेते एखादा गंध तव श्वासाचा

## जनार्दन जाधव (देवदास)

### ।। भोवळ ।।

जगण्याचा प्रश्न
अनुत्तरित रहातो तेव्हा
समुद्राने सुर्य गिळलेला असतो
त्या सायंकाळचे विव्हळणे
अस्थिपंजर रोग्यासारखे
सोनेरी किरणांची स्वप्ने
सागरात खोलवर लुप्त होतात..
अंधारांत फक्त उसळणाऱ्या
लाटांचे आवाज........

क्रूर श्वापदासम
आणि.. सभोवार आवाज चिरतो
रक्ताने माखलेला
त्याला त्याचा रंग
जसा प्रश्न... तसेच उत्तर
तरीही अनुत्तरीत !!

# "क्षितिज" विषयी थोडेसे ...

काढ सखे गळ्यातील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलीकडे
उभे दिवसाचे दूत ... . !

कुसुमाग्रजांची कुसुमकोमल कविता वाचतांना काळ्या मखमली शालीमध्ये स्वतःला गुरफटून घेतलेला रसिक क्षितिजां पलिकडून येणाऱ्या प्रकाश किरणांच्या स्पर्शाने सावध होतो, कल्पनेतल्या प्रीतीच्या मस्तीत बेधुंद झालेले जीव सत्याचा उजेड चाखताच खडबडून जागे होतात, नि त्यांनाही जाणीव होते.

ध्येय प्रेम आशा यांची
होतसे का कधी पूर्ती
वेड्यापरी पूजतो या
आम्ही भंगणाऱ्या मूर्ती ... .. !!

कारण सत्य हे उजेडाइतकं स्वच्छ असतं, कित्येक युगं अंधःकारात धडपडणारा आत्मा जेंव्हा आत्मनिरीक्षण करतो तेंव्हा तो सत्याच्या जाणीवेने आत्मनिवेदनहि करतो ....

ग्लानी ही पौरुषाला अमुच्या न ये कदापी
उच्छाद लाख मांडा ना ढासळू कदापी
व्हा सावधान आता समशेर शद्व झाले
सारे ऊजेड अमुच्या डोळ्यात साठलेले
काढा सुरुंग आता वाटेत पेरलेले ...... !

'क्षितिज' च्या कविता वाचतांना कवी मधूकर आरकडे यांची ही कविता नजरेत भरली नि थेट मनात उतरली. कविता म्हणजे एक जाणीव की जिच्या मुळाशी भावनांची एक निर्झरिणी असते. भावनांनी मन डवरुन आलं की निर्झरिणी उत्स्फूर्त उचंबळून येते नि भार हलका करण्याठी उतार मिळेल तिथे वहायला लागते... मरुभूमीतून ... दहनभूमीतून ... खडकाळ रेताडातून, नाहीतर हिरव्यागार वनराईतून ती सतत वहात असते. तिला नदी मिळे-पर्यंत...... कवीचही असच आहे. भावनांनी ऊर भरुन आला की त्याला त्या कुठतरी व्यक्त कराव्याशा वाटतात नि त्यासाठी तो माध्यम शोधीत असतो. कुणी शद्बांचं, कुणी सुरांचं, कुणी रंगाचं, तर कुणी आणखी कसलं. प्रत्येकजण हा उफाळून आलेल्या भावनांचा भार हलका करण्याचा प्रयत्न करीत असतो, आणि हा भार हलका करताना ज्याची मांडणी प्रभावी ठरेल तो श्रेष्ठ कलाकार म्हणून गणला जातो. परंतु साऱ्यांच मूळ मात्र एक भावनांचं प्रगटीकरण.

"क्षितिज" हा काव्यसंग्रह वाचतांना यात समाविष्ट झालेले बेचाळीस कवी आपापल्या परीन आपल्या कलात्मक शद्बांतून आपल्या भावना प्रगट करतांना आढळतात. सप्तरंगाच्या वेगवान गतीतून अखेर शुभ्र पांढऱ्या रंगाच प्रगटीकरण व्हावं तस या अनेक कवींच्या अनेक प्रकारच्या भावविलासातून अेक निर्मळ काव्य आपल्यां अनुभवाला येतं यात शंकाच नाही.

कवीच्या नांवावरुन आणि त्याच्या प्रसिद्धीवरुन वा विद्वत्ते-वरुन तो कवी श्रेष्ठ की कनिष्ठ हे ठरविण्याची कित्येकांची वृत्ती असते. अनेक पुस्तकांची पारायणं केलेला, खूप पदव्या मिळविलेला पुस्तकज्ञानीच मोठा कवी असतो असं कित्येकांचं मत असतं, नि त्यामुळे नव्या दमानं आपल्या भावना व्यक्त करणारा एखादा उमेदीचा कवी दुर्लक्षिला जातो. त्याच्या भावनांच्या आविष्काराचा नकळत अव्हेर होतो. एखाद्याच्या वृत्तीत हे काव्यगुण उपजतच

असतात याची कोण दखलच घेत नाही. सोळा वर्षाचे संत ज्ञानेश्वर त्यांची भावंडे निवृत्तीनाथ, मुक्ताई तसेच संत नामदेव, तुकाराम एकनाथ महाराज, रामदास स्वामी, जनाबाई, बहिणाबाई यांचं काव्य वाचलं की एखाद्या उजाड माळावर सुगंधानं बहरत गेलेल्या फुलांचा ताटवाच दर्वळून निघावा अस वाटत. तो निरंतर सुगंध आजही तितकाच ताजा आणि तरल वाटतो. अनुभूतीतून उमलून आलेल्या भावनाच श्रेष्ठ काव्याला जन्म देत असतात याची रसिकाला प्रचिती येते. पुस्तकी ज्ञानाची लयलूट केलेला एखादा प्रकांड पंडितहि नम्रतेनं अभिवादन करील, असा हा प्रतिभेचा महासागर या कवी मंडळीच्या हृदयातून पाझरलेल्या भावनांच्या निर्झरातूनच निर्माण झाला आहे. हे कुणीहि रसिकमनाचा माणूस कबूल करील. कारण कुठल्याही काव्य निर्मितीसाठी पुस्तकी पांडित्यापेक्षा कविचा पिंड असणे आंवश्यक असते. गुरुवर्य कवी ग. दि. माडगुळकरांचे विचार या ठिकाणी सांगावेसे वाटतात, की, एखादी विदुषी वैद्यकीय शास्त्रातले खूप ज्ञान प्राप्त करुन डॉक्टर होईल. स्त्री रोगतज्ञ, प्रसुतिविज्ञान या सर्व गोष्टीत पारंगत होईल, परंतु तीच स्त्री स्वत: वांझ ठरु शकेल. तिला मूल होईलच असं नाही. तर अपत्य प्राप्तीसाठी जशी मातृत्वाची कूस असावी लागते, काव्य निर्मीतीसाठीसुद्धा अशीच कूस असणं आवश्यक असतं. "क्षितिज" वाचतांना मायेच्या कुशीतून आलेली ही विविध गुणांची लेकरं आपापली सुखदुख: सांगताना भारावून जातात.

हे कोरडे किनारे हसतात का गतीला
या वाहत्या जळाला का तेच सोबतीला
फसवी इथे तिथे ही राने विसावलेली
डोळे भरुन येतो माझे अशाच वेळी

मधुकर आरकडेंची ही दुसरी कविता मनातल्या वेदना अशा हळुवारपणे व्यक्त करतांना मध्येच मनातला उद्वेगही प्रकट करते.

अंधारातल्या दिशांनी हे मार्ग रोखलेले
येथे उजेड त्यांना सारे फितूर झाले
कृत्रीम या दिव्यांची आरास पेटलेली

मनोभावनांची एक एक पाकळी अशी उलगडत जाते. एखाद्या नाजुक पाकळीतला बोचरा कणखरपणा जेंव्हा आपल्याला जाणवतो तेंव्हा वेदनांचे अनेक भाले झेलून झेपावणारं मन कवी विद्याधर दशपुत्रेंच्या कवितेतून बोलून जाते...

कधी काळचा सूर्य उगवता
अंधारातच देह बुडावा
पैजा मरण्याच्या घेता घेता
जीवन ! जीवन... ! घोष करावा
चैतन्यांच्या कणाकणांनो
तेज आपुले विझवुन या रे
मुर्दाडांच्या मृत आशांवर
घरटे अपुले उधळुन या रे .. !

भावनांची ही विविध आंदोलनं विचारांच्या प्रवाहावर दोलायमान होत असतात आणि त्याच्या भावलहरी रसिकांच्या मनापर्यंत पोहचत असतात. कवी आणि रसिक यांच्या मनाचे हे झणत्कार असे जुळले कि रसिक हा कवीच्या विचारांशी... भावनांशा .. समरस होतो नि कविता वाचता-वाचता तो ती अनुभवतो. त्याच्या गत जीवनातल्या अनेक आठवणींना पुनश्च पालवी फुटते, आणि इथेच कविता यशस्वी झाल्याचा अनुभव येतो

.... तुझ्या प्रांजल नेत्रामधले
भाव अनामिक मज स्पर्शावे
तुझ्याच हृदयी मत्प्रेमाची

लहरावी गे गोड शिरशिरी
...अशी असावी प्रीत बावरी...

प्रतिभा धोत्रे प्रेमिकाच्या मनातला एक कप्पा हळुवारपणे उघडतात धुंदनिशिगंधात बुडून जाणारी कोवळी सांज आणि त्यातूनच धुंदफुंद झालेली गर्द काजळी रात मुग्ध होऊन लाजत मुरडत कावरी बावरी होऊन फलून यावी या कल्पनेनच रसिक मन मोहरुन जाते.

परंतु या धुंदावलेल्या रात्रीचं सारं सुख काळोखाच्या मलमली रेशमात गुंडाळून ठेवून अंधारात रातराणीच्या गंधासारखी विरुन जाणारी कंकणांची किणकिण काळजाशी धरुन ठेवीत मलूल होणारी समईची वात पाहिली कि गोविंद बोत्रे म्हणतात ..

केशर ओले शब्द निसटतांना
मी खुळ्यासारखा ऊभा होतो...
...प्रत्येक शद्व आता दंव झाला आहे
कधी कधी डोळयांच्या किनारीवर
चमकून उठतो ... !!

असा हा प्रीतीचा स्वप्नभास एकाएकी विरुन जातो. मन सैरभैर होतं. कुणाला काय सांगाव ! कुणाशी काय बोलावं कळत नाही. एकांतात मन उघड केल जातं ते आपल्या कवितेपुढे प्रीती-भंगाचे हे सूर जुळताना कवी श्रीकृष्ण वावगे म्हणतात...

सूर उमटले मनी विरहाचे
शब्द उमलले.... नयनी आसवांचे
शिळा भंगली गत स्वप्नांची
...धुक्यात हरवली वाट प्रीतिचा... !!

परंतु पहाटे पहाटे ज्या क्षितिजावर उषा ऊमलतांना कवयित्री आशा पाठारे यांना अनोखे रंग ठिबकलेले दिसतात.

...दवबिंदुचं पाऊल थबकताना
फुलाफुलातून सूर दर्वळताना

त्या म्हणतात .....

कुणी पाहिले नभास वेड्या
मिठीत जाता क्षितिजाच्या
खुणा कोण या ठेवुन गेले
कळी कळीतुन हृदयाच्या !!

किंवा......

गवत फुलांचे स्पर्श अनोखे
हळुवार मी चुंबियले
नाजुक पर्णांवर लज्जेचे
सूरच सारे ओघळले.... !!

पहाट फुलतांना एकाच क्षितिज रेषेवर अनेंक रंगाची अुधळण व्हावी, त्या प्रमाणेंच या "क्षितिज" काव्य संग्रहात कित्येक ठिकाणी एकाच कल्पना बिंदूत अनेंक भावनांचा विलास या विविध कवींच्या काव्यातून झालेला आढळतो.

पंखात आठवांच्या ओले अजून श्वास
क्षितिजात शून्य ढळते ही सांज का निराश
तुळशीतल्या दिव्यात अंधाररात्र झुरते...

असा विषण्णभाव रेखाटतांना आशा पाठारे तितक्याच भाव-विवश होतात. कवीचा पिंडच असा तसावा लागतो, स्वानुभूति असो परानुभूति, कवीनं त्या अनुभूतीशी एकजीव झाल्याशिवाय... तादात्म्य पावल्याशिवाय त्या अनुभूतीचा अविष्कार रेखीवपणे करता येत नाही.

मनातल्या प्रीतीचा नाजुक भाव गुंफतांना एके ठिकाणी आशा पाठारे म्हणतात

...तू येतांना नभ आतुरले ओथंबुनी खाली
मुग्ध दाईच्या गालावरती नक्षी रेशिम झाली

तितक्या तन्मयतेनं पावसाचं वर्णन करतांना कल्पनेच्या हळव्या सरीत त्या चिंब भिजून जातात. त्यांच मन मोहरुन येतं नि शब्द निथळतात......

पंख पाखराचे ओले तया भार साहवेना
येई झिंगून हा वारा तया तोल आवरेना
घन निळ्या नादातून रान वेडे नादावले
ओल्या सावळ्या मिठीत गर्द हिरवट झाले !!

या पावसाचं रुप वेगळ्या प्रकारे प्रतिबिंबित करतांना दुःखावेगानं भांबावलेलं कवी जयवंत वैती यांच मन व्याकूळतं नि कळवळून म्हणतं......

डोक्यावर असं आभाळ
अन् धुवांधार दुःख सोबताला
आक्रोशणाऱ्या वेदना घेऊन
पाऊस डोळ्यातून आला...... !!

असं हे भावनांच वैविध्यपूर्ण चित्र आपणाला "क्षितिज" या काव्य सग्रहात अनुभवायला मिळेल... हे अनुभवाचं विश्व या सग्रहात एकत्र आलेल्या सर्व कवींनी मोठ्या कल्पकतेनं मांडले आहे.

कुठलाही आडपडदा न ठेवता मनात उसळून आलेल्या भावनांच सत्य दर्शन या कवींनी आपल्यापाशी असलेल्या अनु

भवाच्या शिदोरीच्या सहाय्याने रसिकांना घडविण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. या अनुभवाच सत्य सांगताना कवी अजय काणेकर आपल्या 'सत्य' या कवितेत म्हणतात.

'सत्य असतं सत्यासारखं
अर्ध्या भरलेल्या पेल्यासारखं
एक म्हणतो... .
''अर्धा पेला भरलेला आहे,
एक म्हणतो,
'अर्धा पेला रिकामा आहे
दोन्हीही सत्यच
...सत्य अर्धे नसते
अर्धे असतो आपण...

अकारण आपल्या हट्टाशी ठाम असलेल्या माणसांचही असच असत. हा नवा कवी, हा जुना कवी, हा मोठा कवी, हा लहान कवी अशी अकारण तुलनात्मक समीकरण मांडणारी माणसं अखेर आपल्याच जागी रहातात. प्रगतीशील विचारांना स्पर्श देखील करु इच्छीत नाहीत. आणि हे विचारच प्रगतीच्या आड येत असतात. त्यांच्या स्वत.च्या आणि दुसऱ्यांच्याही. कारण या अप्रगत विचारा-मुळे पुढं जायचा दुवाच निखळला जातो. पुढे गेलेल्यांनी आपल्या मागून येणारांचा हात धरुन त्यांनाही वर काढण्याचा प्रयत्न करा-यला हवा मागे आहेत ते मागासले आहेत, अप्रगत आहेत. अशा विचारांचा आपल्या मेंदूला स्पर्शही होऊ देवू नये... केवळ तुलने-तच आपला वेळ घालवला तर "ही पुन्हा न येइल वेळ'' हेच खरे परंतु "क्षितिज' या काव्यसंग्रहातले सर्व कवी कुणाच्याहि आधाराची वाट न पहाता स्वयंतेजाने... स्वयंप्रेरणेच पुढे आलेले आहेत. स्वतःच्या परिश्रमानेच आपली ही कलाकृती त्यांनी रसिकांसमोर ठेवली आहे.

" अरे वेडचा मना नकोस उगाच झुरु
जीवनाचा खेळ खरा आता झालाय सुरु
सागरामधला तू एक थेंब
बागेतल्या ताटव्याचे तू एक पान
परि तुझ्या विना ना उसळतील लाटा
ना वाढतील उंच तरु

हे जीवनातलं त्रिकालाबाधित सत्य कवी एस. बो. वाडेकरांनी आपल्या कवितेत मांडले आहे. याची जाणिव प्रत्येक नवोदिताने ठेवली पाहिजे. बीजाला आलेला इवलासा अंकूरच केंव्हातरी भव्य वृक्षाचे रुप धारण करीत असतो हे जगातलं सत्य आहे. परंतु त्यासाठी त्या अंकुरानं आपल्यातला हिरवेपणा... ओलावा टिकवून ठेवला पाहिजे. नव्या कवींनीही जीवनातल्या अनुभूतीचं अध्ययन, मनन आणि चिंतन केल तर त्यांच लेखनहि भव्य वृक्षासारखं डेरेदार आणि देखणं होईल यात शंका नाही. इवल्याशा पानांचं छोटंस गुलमोहराचं झाड वाढलं नि चैत्रात बहरलं की लालतांबूस फुलांचा आभरण ल्यालेल्या त्या तरुवराचं जीवन प्रत्येकानं अभ्यासण्यासारख असतं. कवयित्री वसुंधरा गोरे म्हणतात.......

चैत्रातला तुझा बहर
छेडून जाई भावुक सतार
मनामनातला पारवा
लपेटून वासतिक दुलई
सुगंधी आम्र मंजिरीच्या
फुलतो प्रमत्त लयीवर......!!

उन्हाळ्या पावसाळ्यासारखे अनेक ऋतु झेलल्यानतर जसं गुलमोहराचं हे बहारदार रुप मन मोहून टाकणारं होतं, तसच कवितांचहि असतं. लेखनाच्या सरावान "क्षितिज" मधल्या कवींच्या कविताहि आकर्षक... मन वेधून टाकणाऱ्या होतील यात संदेह



ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

नाही. आज फक्त या कवींना हवी आहे आपुलकीची दाद, रसिकां कडून जर ही दाद मिळाली नाही, तर या भावूक कवींची मन दुखावतील त्यांची कविता तिथेच थांबेल नि कवी किरण फाटकांच्याच शद्वात आम्हांला म्हणाव लागेल... ..

धुंदलेल्या मोगऱ्याला दाद ना आम्ही दिली
तुडवुनी गुलमोहराची शान आम्ही मोडली
साद त्यांनी घालिता ही आसवे आली कुठोनी ?

ज्यांनी आपली मनं सुखदु:खाच्या आठवांची साठवण करुन जिवंत ठेवली त्यांची मनं सांभाळणं त्यांच्या मनाच्या सुखदु.खात आपणही थोडं डोकावलं... सहभाग घेतला तर दोन मनातला दुवा साधल्याचा एक वेगळा आनंद निर्माण होईल. कवी हृदयातल्या... मनातल्या वादळात आपल्याला झेपावता आलं नाही पण निदान डोकावलं तरी आपल्या वेदनांची जाण असलेला कुणी एक रसिक आपल्याला गवसल्याचा आनंद त्यांना आपण देवू शकू.

रंग पेटीतल्या रंगांची हजारो वादळ
समुद्र ढवळून काढीत
तुझ्या डोळ्यात उसळतांना
तू भिरभिरुन मला शोधतेस
त्यावेळी मी स्वत:शीच हसतो
वादळातला वारा
फारच थोड्यांना दिसतो

कवी डॉ. र. म. शेजवलकर यांची ही कविता मनातलं काहूर सांगून जाते. "क्षितिज" मधल्या साऱ्याच कविता अशा मनातून आणि मनापासून निर्माण झालेल्या आहेत त्यात मनाची तृप्तीही आहे आणि अतृप्तीही आहे.

कवयित्री सुरेखा देशपांडे म्हणतात—

काही क्षण तुझ्या भेटीचे
तुझ्या प्रेमाचे... अमृताने रसरसलेले !!
काही क्षण तुझ्या भेटीसाठी
तळमळणारे .. विरहानें व्याकुळलेले ..
असंख्य क्षण तुझ्यासाठी झुरणारे
प्रयत्न करुनही तुला न विसरलेले

अशा कविता वाचतांना भावनांची तळमळ व्यक्त करतांना योजलेले शब्द आपल्या मनाचा ठाव घेतात, कवीच्या मनातली प्रामाणिक तळमळ वाचकाला बेचैन केल्याशिवाय रहात नाही. नकळतच उर्दू शायरीतला इष्क आणि दर्द मनाला पोखरुन जातो आणि कवी विजयकुमार सरगडेंची गजल साकार होते.

''दग्ध हृदयाची कहाणी तू अशी वाचू नको
सांडणारे अश्रू माझे चोचीने वेचू नको''

विरहाचे असे दर्दभरे भाव वेचणारा हा कवी क्रांतीच्या विचारानें जेंव्हा बेभान होतो, तेंव्हा त्याच्या शब्दाना एक आगळीच धार येते.

''थापाड्यांच्या नकोत थापा
थाप डफावर अशी हवी
गर्जत हरहर सह्य गिरीवर
दुमदुमणारी साद हवी
तलवारीच्या पात्यालाहि
बिजलीची ती धार हवी

अशा तडफदारपणे ते आपले विचार मांडू शकतात. ज्या विचारांची आज समाजाला गरज आहे. कवितेला एक विशिष्ट ताल आणि सूर असेल तर ती कविता अधिक परिणामकारक होते. कुसुमाग्रजांची –

नाही. आज फक्त या कवींना हवी आहे आपुलकीची दाद, रसिकां कडून जर ही दाद मिळाली नाही, तर या भावूक कवींची मन दुखावतील त्यांची कविता तिथेच थांबेल नि कवी किरण फाटकां-च्याच शद्वात आम्हांला म्हणाव लागेंल... ..

धुंदलेल्या मोगऱ्याला दाद ना आम्ही दिली
तुडवुनी गुलमोहराची शान आम्ही मोडली
साद त्यांनी घालिता ही आसवे आली कुठोनी ?

ज्यांनी आपली मनं सुखदुःखाच्या आठवांची साठवण करुन जिवंत ठेवली त्यांची मनं सांभाळणं त्यांच्या मनाच्या सुखदु.खात आपणही थोडं डोकावलं... सहभाग घेतला तर दोन मनातला दुवा साधल्याचा एक वेगळा आनंद निर्माण होईल. कवी हृदया-तल्या... मनातल्या वादळात आपल्याला झेपावता आलं नाही पण निदान डोकावलं तरी आपल्या वेदनांची जाण असलेला कुणी एक रसिक आपल्याला गवसल्याचा आनंद त्यांना आपण देवू शकू.

रंग पेटीतल्या रंगांची हजारो वादळ
समुद्र ढवळून काढीत
तुझ्या डोळयात उसळतांना
तू भिरभिरुन मला शोधतेस
त्यावेळी मी स्वतःशीच हसतो
वादळातला वारा
फारच थोडयांना दिसतो

कवी डॉ. र. म. शेजवलकर यांची ही कविता मनातलं काहूर सांगून जाते. "क्षितिज" मधल्या साऱ्याच कविता अशा मनातून आणि मनापासून निर्माण झालेल्या आहेत त्यात मनाची तृप्तीही आहे आणि अतृप्तीही आहे.

कवयित्री सुरेखा देशपांडे म्हणतात-

काही क्षण तुझ्या भेटीचे
तुझ्या प्रेमाचे... अमृताने रसरसलेले !!
काही क्षण तुझ्या भेटीसाठी
तळमळणारे .. विरहानें व्याकुळलेले ..
असंख्य क्षण तुझ्यासाठी झुरणारे
प्रयत्न करुनही तुला न विसरलेले

अशा कविता वाचतांना भावनांची तळमळ व्यक्त करतांना योजलेले शब्द आपल्या मनाचा ठाव घेतात, कवीच्या मनातली प्रामाणिक तळमळ वाचकाला बेचैन केल्याशिवाय रहात नाही. नकळतच उर्दू शायरीतला इष्क आणि दर्द मनाला पोखरुन जातो आणि कवी विजयकुमार सरगडेंची गजल साकार होते.

"दग्ध हृदयाची कहाणी तू अशी वाचू नको
सांडणारे अश्रू माझे चोचीने वेचू नको"

विरहाचे असे दर्दभरे भाव वेचणारा हा कवी क्रांतीच्या विचारानें जेंव्हा बेभान होतो, तेंव्हा त्याच्या शब्दाना एक आगळीच धार येते.

"थापाड्यांच्या नकोत थापा
थाप डफावर अशी हवी
गर्जत हरहर सह्य गिरीवर
दुमदुमणारी साद हवी
तलवारीच्या पात्यालाहि
बिजलीची ती धार हवी

अशा तडफदारपणे ते आपले विचार मांडू शकतात. ज्या विचारांची आज समाजाला गरज आहे. कवितेला एक विशिष्ट ताल आणि सूर असेल तर ती कविता अधिक परिणामकारक होते. कुसुमाग्रजांची –

"गर्जा–जयजयकार क्रांतीचा
गर्जा जयजयकार"

किंवा केशवसुतांची –

"एक तुतारी द्या मज आणुनि
फुंकिन ती मी स्वप्राणांनी"

या रचना आजही वाचकांच्या मनाचा ठाव घेतात. याच कवींच्या पावलांवर पाऊल ठेवून "क्षितिज" मधल्या काही कवींनी समाज–जागृतीचे कार्यहि आमची कविता करु शकते हे दाखवून दिले आहे.

कल्पनांच्या मनोराज्यात रमतांना कविमन जितकं हलकं फुलकं होतं, तितकंच ते आठवणीच्या कळचाफुलं उमलतांना भारावून जातं कवी शंकर आपटे म्हणतात –

"अथांग सागर पाठीमागे त्याचा भव्य किनारा
निशिगंधाने धुंद होतसे आकाशातिल तारा
मधुमालतिच्या त्या वेलीची समोर होती कमान
इथेच होते तुझं राजसा घरकुल इवले छान!

गतजीवनाच्या आठवणींना पुन्हा उजाळा देता देता कुठं तरी विचारांच झंझावती वादळ सुसाट धाऊन येतं. आपलं प्रज्वलीत व्यक्तिमत्व सहन न होऊन अकारण आग पाखडणाऱ्या अधमावर हे कटू अनुभवांनी तावून सुलाखून निघालेलं मन शब्दहार फेंकल्याशिवाय रहात नाही.

"आकाशाला धूळ चारणारं
एक वादळ अजून यायचंय
जन्म घेऊन
तोपर्यंत फक्त होणार आहे पैदास
सुर्याचा प्रकाश सहन न होणाऱ्या
वटवाघळांची......!

कवी प्रदीप देशपांडे असे जळजळीत विचार मांडून मोकळे होतात अगदी निर्भिडपणे. कारण या जगात प्रकाश पाहूनहि प्रकाश नसल्यागत वावरणारे प्रकाशाची अवहेलना करणारें अंधारल्या मनाचे काही महाभाग वावरत असतात. दिपांलाहि दिवटा म्हणायला मागेपुढे काहिही पाहत नाही अन मग कवयित्री अश्विनी रा. कुलकर्णीची कविता विषण्ण होत म्हणते......

"आज आहे मी... परि नसल्यासमान
जिवंत असून... जिवंत नसल्यासमान
आहेत पहात मजकडे एक क्षुद्र म्हणून...
आणि पाही मी जगी या... काही आपुले म्हणून...

क्षणोक्षणी अवहेलना उपेक्षा यांचाच अनुभव घेतवेले हे जीव असे विषण्ण सुरावटीत आपले भावशद्व गुंफतात. कवी रामदास गरुड म्हणतात.......

"आता आहे धावायचे
पळायचे.... पडायचे
आणि केव्हा कुठे तरी
जाऊनी गे मरायचे !!

क्षणभंगूर तृप्तीनं समाधानी होणं, त्यांना जमत नाही. या जगात आत्मीयता, जिव्हाळा यांची सदैव उणीव त्याना भासते कारण त्यांना खऱ्या प्रेमानें माझे म्हणणारे कुठंच कुणी भेटत नाही. आणि म्हणून मन जळत तळमळत... या संतपंथाच्या खंडप्राय देशात आपल्या जखमांवर हळुवार फुंकर घालायला कुणी तयार नाही याचं दुःख होतं आणि या दुःखावेगाचे शद्वस्फुल्लींग कवी अरुण वर्तक यांच्या कवितेच्या रुपानं जागे होतात.

मग.....
इथल्या दलालांना
कलालांना, कावळ्यांना

घुबडांना, नि चालत्या फिरत्या
मुडद्यांना...
केंव्हा बरं प्रकाशणार क्रांतिसूर्य ?
खऱ्या अर्थानं !!

हा सारा उद्वेग सारा दुःखभार सहन करुनहि लिखाणातली आर्तता... ओलावा... कायम ठेवण्याचं कौशल्य या 'क्षितिज' च्या कवी मंडळींना कायम ठेवलं आहे.

कवयित्री राजस कल्याणकर म्हणात......

"सावळी धनदौलत पोटाशी वागवीत
आभाळ अगदी अवघडून नेलेलं
माझ्या निर्धन खिडकीत
उदार आकाशापुढे आतुर पदर पसरलेला
माझ्या डोळ्यात आजन्म तहानलेलं वाळवंट
मैल मैल अस्ताव्यस्त
अशी आकर्ण ताणलेल्या प्रत्यंचेसारखी
ही आर्त ओढ .........

हे सारं कांही काळजाला छेदून भेदून जातं, वाचकाला या कवीतल्या नवेपणाचा क्षणभर विसर पडतो, कल्पना आणि कल्पनेंची प्रतिकं इतक्या सहजतेनं आलेली आहेत की वाचक तन्मय होतो, आणि इथंच काव्याच्या यशस्वीतेची खुणगाठ असते.

"आणि तुझ्या तहानलेल्या ओंजळीत
मी जेंव्हा माझ्या सर्वस्वाची सततधार धरीन
त्या आधीच कदाचित
मी पुरुषभर पाण्यात पूर्ण बुडालेली असेन
पूर्ण बुडालेली असेन......!

कवयित्री कल्याणकरांचे हे भावविष्कार खरोखरच कौतुकास्पद आहेत,

'क्षितिज' मध्ये समाज जीवनाची प्रतिबिंबहि आढळून येतात ढोंगी आणि आपमतलबी समाजधारिणांची लोकसेवेच्या सोंगाची वस्त्र इथं बिनधास्तपणें टरकावलेली आढळतात कुणाच्याहि राग-लोभाची पर्वा न ठेवता कवि चांगदेव काळे म्हणतात...

पुण्याच्या राशीवर लोळणारे तुम्ही
आडवाटेने आलात
महापुण्याच्या बेटावर जायचे तुम्हाला पण ...
...माझी झोपडीही नेली शेकोटीसाठी
अगोदरच्या पुण्यात्म्यांनी...
तुम्ही माझे भस्म लावा
महा पुण्यात्मे व्हाल
बस्स हीच सेवा समजा !!

इथं अनुभवलेले चटके जाणवतात... दारिद्र्याच्या अग्नीत होरपळलेलं जीवन आणि या असल्या पिढीत जीवनाचं भांडवल करुन जगणारे समाजसेवक यांच्या कतृत्वाचा (!) उपहासगर्भ इतिहास अशा कवितांतून दिसतो... हा इतिहास वास्तव आहे. सत्य आहे. आणि सत्य हे नेहमीच कटु असत. 'दोन मनाची एक व्यथा सांगताना कवी शेखर अनंत धोत्रे म्हणतात......

''रसिकांना हवी आहे कविता, तिच्या माझ्या शृंगाराची
''पण कल्पनेतला तो शृंगार ? वाटतं.......
मी माझ्याच प्रतिभेवर करतोय बलात्कार !
कल्पनेच्या कळ्या कागदावर चिरताना
वास्तवाचे काटे मला घायाळ करतात !!

वास्तवात समाजवादाची होळी चालली असतांना कवी केवळ शृंगारात कसा बुडून राहील? अन्याया विरुद्ध जो आवाज उठवणार नाही तो कसला माणूस ! अन्याय, गुलामगिरी सहन न होऊन

समाजवादांच स्वप्न पहाणारा रविन्द्र आवटीसारखा कवी पोटतिडकीनें म्हणतो......

"गिरण्यांच्या चिमण्यांच्या धुरातून
साफ करण्या काळवडलेल्या मालकांचे चेहरे
काळवंडलेल्या चर्चचे घटेचे निनाद
दुर्देवी सैनिकांचे नि:श्वास
हे सर्व हृदय कथीत करतात
पुढारी गरीबीचे बुरखे घेतांत ...!!

हे आजचं समाजचित्र बदलून टाकलं पाहिजे. मोठा मासा लहान माशाला खातो तसा मोठा माणूस लहान माणसाला आज खात आहे.

मग खरा मानवतावाद दिसणार कुठून ? पण हे चित्र नष्ट केलच पाहिजे. जगात मानवता आणंल्याशिवाय माणसाला तरणोपाय नाही. त्यासाठा कितीहि काटेरी वाटा तुडवाव्या लागल्या तरो त्याची फिकिर नाही.

काही मार्ग काटेरी
काही मार्ग रुपेरी
त्याची मला पर्वा नाही
ते मी तुडवणार आहे
कांही दिशा सोनेरी
कांही दिशा काळोखी
त्याची मला पर्वा नाही
माझी दिशा गाठणार आहे!

अशी जिद्द ठेवून आज कवी चालला तर उद्याचा उष:काल उज्वल झाल्याशिवाय रहाणार नाही.

मांडणी... मनोभावांचे मोकळे प्रगटीकरण रचनेतलं नादमाधुर्य या सर्व गोष्टी त्यांच्यापाशी आहेत, जितक्या तन्मयतेने ते प्रेमभाव व्यक्त करतात तितक्याच प्रखरतेने ते उपहासही या गजल प्रकारात मांडतात

"फस्त केले पिंड यांनी पळविले नैवद्यहि
हे अधाशी कावळे या सर्व यांच्या पंगती
गर्जती वाघापरी हे म्होरके गल्लीतले
तेच दिल्लीच्या समोरी ढोपरावर रांगत"

अशी ही उपहासगर्भ गझल वाचतांना संभावितपणाचा आव आणून केवळ स्वतःचं उखळ पांढरं करुन घेणारी समाजातली स्वार्थी कुत्री कुणाचे खातात आणि कुणावर भुंकतात याचा क्षणो-क्षणी येणारा प्रत्यय बण्डा जोशींनी आपल्या बंडखोर शब्दांत चांगलाच शब्दांकित केल्याचा अनुभव आपणास येतो.

कवी शिवराम देवलकरांची हा कविता तितकीच बोलकी आहे. कामगाराच्या व्यथा व्यक्त करतांना ते सांगतात,

"हॅलो, मी कामगार बोलतोय
....... माझ्या डोळ्यात इकडे संग्राम पेटलाय
रक्तात पेरलेलं क्षितिजहि हाका मारीत उठलय
तळहातावरील रेषान् रेषा
मार्चिंग सॉंग गात पुढच गेल्यात......

अशा बोलक्या शब्दानं सारं काही सांगताना त्यांचा विश्वास कायम आहे. अखेर विजय सत्याचा, श्रमाचाच आहे, हे निःसंदीग्ध पणे सांगतायत.

''पण लक्षात ठेवा
आम्ही केंव्हाच काळोख झाडून
दिशा साफसूफ करुन ठेवल्या आहेत
कारण
उजेडाचे आम्हीच खरे वारसदार...!!

सा-या दगदगीनं व्यापलेलं माणसाचं जीवन मात्र क्रांतीसाठी आसुसलं आहे. या धकाधकीत जगण्यासाठी चाललेले हे लपंडाव आता सरले पाहिजेत. क्रांती झाली पाहिजे असं वाटत असतानाच

''पुढा-यांच्या पोटाचे घेर वाढवणारी
दारिद्र्यरेषेचा फेर वाढवणारी क्रांती

कवयित्री संध्या पराडकरांना दिसते. स्वतःचं भक्ष्य मिळवायला हपापलेल्यांच्या क्रांतींचं रुप उघड करुन दाखवतांना त्या म्हणतात–

आमची क्रांती रक्तरंजित खरी
पण ते रक्तहि आमचेच !!
ती उदात्त क्रांती विसरा आता
आता नुसत्या मागण्या, घोषणा
निशाणी, धिक्कार आणि शिवीगाळ

असे स्पष्टोक्तीचे घणाघात घालून समाजातल्या झोटिंगशाही दांभिकतेचे बुरखे फाडणारे कवीही 'क्षितिज' मध्ये आहेत. समाजात दडून बसलेला विध्वंसाचा राक्षस मानवतेचं बेगडीरुप धारण केलेला असतो. त्याला उघड करतांना अपंगवर्ष या आपल्या कवितेत कवी विजय जामसंडेकर म्हणतात–

''या कंत्राटी संस्कृतीत माणसांच्या महापुरातून
त्यांच्या वहात जाणाऱ्या कुबडया

बस-रेल्वेच्या बिन चेहऱ्याच्या कळपात
चिरडलं जाणारं त्यांच्या शरिराचं बोचकं
लाथाडतात इथले संस्कृतीचे पाय
तेंव्हा ते करतात
इथल्या बेगडी मानवतेला सलाम !!

विजय जामसंडेकरांची रचना मोठी मार्मिक आहे. ते सहज-गतीनं लिहितात पण काळजाला हात घालतात.

''वेशीवर टपकणाऱ्या कावळ्यांच्या सावल्या
"काळ्या कथांचा लाल इतिहास"
किंवा
'गळ्यात अडकलेला दगड भूतकाळ फोडतांना
गातो आहे मानवमुक्तीचे गीत"

अशी मनाची पकड घेणारी प्रतिमा त्यांच्या काव्यात जागो-जाग आढळते.

मन रंगीत रंगीत
सप्त सुरांचे संगीत !
मन खटयाळ खटयाळ
अेक वारं अवखळ !!

असं मनाचं अनाकलनीय रुप सांगताना कवयित्री वासंती नांदेडकर अनेक कल्पनांच्या सहाय्याने मनाची नाना रुपं आपल्या नाजुक साजुक शब्दानं साकार करतात, तर कवी जनार्दन जाधव (देवदास) आपल्या मनातील भाववलय मोजक्या शब्दात मांडताना 'जगण्याचा अनुत्तरित राहिलेला प्रश्न मोठ्या कुशलतेनें मांडतात.

स्वप्नांच्या दुनियेत हिंडताना कवी बबन लोंढे यांनी लिहिलेल्या कवितेचे शब्द म्हणजे रसिकांपुढे ठेवलेल्या ओंजळभर चांदण्यांचं. प्रत्येक शब्द स्वयंप्रकाशित "शब्द" या त्यांच्यां कवितेतली हळुवार जाणीव काळजाला स्पर्श करुन जाते.

"इतस्तत: विखुरलेल्या चांदण्यांची
भरती ओंजळ ती माझ्यापुढे धरते
तिची चांदण्याची ओंजळ घ्यायला
माझ्या जवळ हातच नाहियेत हे तिला
कसं आणि कुठल्या शब्दांत सांगू ?

एखाद्या फुलबागेत अनेक फुलांचे ताटवे असावेत प्रत्येक ताटव्याजवळ थांबल की त्याचा सुगंध वेगळा यावा. वेगवेगळ्या सुगंधाचं आकठपान करीत फिरतांना प्रत्येक कुंजात आपलं मन मोहून टाकावं तसं हा 'क्षितिज' काव्य संग्रह वाचतांना होतं. प्रत्येक कवीनं आपापल्या परीनं खुलवलेलं आपल्या कवितेचं रुप न्याहाळतांना पुस्तक खाली ठेवावंस वाटत नाही.

सारे रस इथं एकत्र आलेले आहे स्वप्नांबरोबर जागृतीही इथं अनुभवाला येते.

कवी हरिश्चंद्र कांबळेंची "माझ्या बंधो ऊठ" ही कविता वाचताना तर आज दलित समाजाला अत्यावश्यक असलेल्या ज्वलंत विचारांची तीं मशालच आहे को काय असं वाटतं.

"माझ्या बन्धो ऊठ
ऊठल्याशिवाय चालणार नाय
आता कधी चुकला बिकलास...तर
आता बाबा येणार नाय !

माणसाला स्वतःचं काही वैयक्तिक जीवन असतं, त्यातले कडू गोड अनुभव त्याच्या बोलण्या वागण्यातून, लिहिण्यातून आपल्याला दिसत असतात. या त्याच्या वैयक्तिक जीवनात जर सुखाची मधुर झुळुक आली तर तो सुखावून जातो, परंतु उदासीन रात्री केवळ चांदण्या मोजीत घालविणारा कवी नेहमीच आपल्या जीवन पटावर आठवणींचा कशिदा विणीत असतो, नि त्यातून त्या आठवणी जर दुःखद असतील तर कारुण्याच्या सुईनं एक एक टाका घालताना कवी भगवान निळेंचं मन म्हणतं,......

"हे सांगताना मला आता दुःख होत नाही
की "पावसाळयात बेघरांचे काफिले
बसावेत वळचणीला !
तसा मी हि घेतलाय आसरा कवितेचा
आपल्या तुटलेल्या संबंधानंतर......

अशा विविध रसांनी भारावलेल्या कविता आपल्याला 'क्षितिज' या काव्य संग्रहात वाचावयास मिळतात... या संग्रहात बेचाळीस कवी एकत्र आल्यामुळे विविध भाव अनुभवतांना रसिक निश्चितच भारावून जातो. "आत्मगाणे'' या कवितेतल्या

"स्वतःचच घरटं डोळयादेखत जळतांना पाहून
पक्षी गात असतो...... आत्मगाणी''

या दोन ओळीत कवीच्या मनोवृत्तीचं खरंखरं चित्रण आपल्याला अनुभवायला मिळतं, जीवनात सुखदुःख येणारच. परंतु त्या सुखदुःखाचे क्षण वेचणं ते टिपून ठेवणं यातलं सुख काही आगळंच असतं आणि हे सुख मिळविण्याचं भाग्य कवीइतकं कुणालाच नसतं. कवयित्री कल्पना वर्तक म्हणतात.. ...

एखादा क्षण घेऊन येतो
सुखाचे चांदणें .. हसणाऱ्या ओठात
एखादा क्षण देऊन जातो
दुःखाचे देणे ·· पाणावल्या पापण्यात
लाख क्षणात एखादाच क्षण
जीवन जगून जातो
हरवलेल्या एखाद्या क्षणांत
मनाला खूपसं गवसून जात ...

क्षणभंगूर जीवनातले हे क्षण टिपतांना काव्य लेखन पद्धतीचे अनेक अविष्कार 'क्षितिज' मध्ये आपल्याला आढळतात. त्यातला सोपेपणा सुगमपणा हा विशेषत्त्वाने जाणवतो. कुठेही दुर्बोधता सापडत नाहीं आणि खऱ्या कवितेचा हा विशेष असतो कुठल्याहि वाचकाला जी चटकन कळते. वाचक अगदी सहजतेने कवितेशी समरस होतो, तेंव्हा तो कविता चांगली असं समजावं

मृदुला श्री. नगरदेवळेकरांची 'खळबळ' ही कविता अगदी साधेसोपे शद्ब लाटांच्या फेसातून उफाळणारा अंतरातला आनंद आणि त्याच लाटांनी प्रस्थापित केलेली नीरव शांतता मनातल वादळ आणि त्याच मनातली उदासीनता चांगल्या प्रकारे सूचित करते.

"आळवी आकाश ओले, भैरवाचे सूर का
वाहती साऱ्या नद्या या, आसवांचे पूर का
जाहला नाही निवाडा, न्यायही नाहीच झाला
कालच्या हळव्या गुन्ह्याची आज शिक्षा क्रूर का?

बण्डा जोशी यांची ही गझल परिणामकारक झाली आहे गझल या प्रकाराला लागणारी दर्दभ-या आणि दमदार शब्दांची

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचं दैदिप्यमान व्यक्तिगत जरी आज महापरिनिर्वाणाप्रत गेलं असलं तरी त्याचं अमरतेज तुला दिव्यत्वाकडे नेईल हे सांगताना ते म्हणतात.

'तुझ्यामागे जग येईल
तरी त्याला सामून घे
प्रज्ञा, शील, करुणाधारा
सर्वाभूती वाटून दे !!
वाटून दे पंचशील
आभाळाचं काळीज कर
जायचं अजून दूर हाय
....प्रत्येकाचा हात धर
...प्रत्येकाचा हात धर !!

जगाला एकतेचा महामंत्र देणारी ही कविता प्रत्येकानं मनन करण्यासारखी आहे.

एकंदर त्रेचाळीस कवी या 'क्षितिज' रेषेवर उज्वल किरणासारखे उभे आहेत. उषःकाली उषा स्वप्नांत रंगून उषेच्या सहस्र रंगांची पखरण करीत यशाचं दिव्य स्वप्न पहात विजया पास्ते देवदत्त साने, सुभाष धोत्रे या संपादक मंडळींनी या त्रेचाळीस कवींना एकत्र आणून –

साहित्य क्षेत्रातल्या काव्य प्रांतात या त्रेचाळीसाच्या सहाय्याने संपादक मंडळींनी घडवून आणलेल्या क्रांतीमुळे यातल्या प्रत्येक कवीला प्रतिभेचं एक स्वतंत्र दालन प्राप्त होईल यात शंका नाही. अर्थातच वाचकांनीही तितक्याच आत्मीयतेने या कवितेला दाद देऊन या कवीच्या श्रमाचं कौतुक करणं अत्यावश्यक आहे.

मी माझं सद्भाग्य समजतो की 'क्षितिज' मधल्या कवींच्या कवितांबद्दल चार शब्द लिहिण्याची संपादक मंडळानं मला संधी दिली, आणि माझ्यावरचं प्रेम व्यक्त केलं.

या 'क्षितिजावर' नव्या तेजाने तळपणाऱ्या काव्य प्रांतातल्या प्रवाशांना मी माझ्या शब्दात एवढच सांगू शकेन की कुणाच्याहि रागा लोभाचा वा टींका टवाळीची तमा न करता आपला प्रकाश देण्याचा प्रवास रात्रंदिवस सदैव प्रगतीनं चालू ठेवा यश तुमच्याच हाती आहे, मी माझ्याच शब्दात सांगेन.

इथे वेदनेला नवा कोंब येतो
उसासाहि होतो कसा निश्चळ
शहारुन जातो घडीचा प्रवासी
सुखा ओढितो वंचनेचा तळ
परी एक तारा मना छेदणारा
पहा भेटला आज उल्का फुला
अशा धुंद रात्री व्यथा धुंद गात्री
असा धुंद यात्री पहा चालला

● शांताराम नांदगावकर

"प्रशांत"
१९ ब, विसावा रस्ता
खार, मुंबई – ४०० ०५२.

REFBK-0023983
REFBK-0023983
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८५
दा. क्र. २३.९.८३
काव्य ३०।९।८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)